

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. १२६५
REFBK-0013498
REFBK-0013498

७३८४०
१९६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

अनुक्रम ७३८४० दि: ०७।८८

क्रमांक १०६५ नोंद दि: ८/३/८९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३४९८
दा. क्र.

# लिं बो ळ्या

REFBK-0013498
REFBK-0013498

गणेश हरी पाटील

मूल्य ३ रुपये

श्री लेखन वाचन भाण्डार, पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना

प्रकाशक :
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
ठोकळ प्रकाशन
लक्ष्मी रस्ता, पुणे २

आवृत्ती पहिली :
जानेवारी १९६१
पुनर्मुद्रण :
जुलै १९६३

सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

मुद्रक :
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय, ' शिव-पार्वती '
४६१।४ सदाशिव पेठ, पुणे २

*दादा व आई*

यांच्या पवित्र स्मृतीस

# लिंबोळ्यांची चव घेण्यापूर्वी

माझा 'रानजाई' हा पहिला काव्यसंग्रह १९३४ साली प्रसिद्ध झाला. त्या वेळीं त्याचे स्वागत अपेक्षेपेक्षा खूप झाले. त्याची दुसरी आवृत्ती काढण्याचा योगही १९४६ साली आला. प्रस्तुत काव्यसंग्रह वस्तुतः १९४८ सालच्या सुमारास प्रसिद्ध करण्याचे ठरले होते. तशी जुळवाजुळवही केली होती, पण त्याच वेळीं मी पुण्याहून बदलून गेल्याने व त्या पुढील काळात सरकारी नोकरीतील मोठ्या जबाबदाऱ्या माझ्या अंगावर पडल्याने हा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचे लांबणीवर पडत गेले. दरम्यान १९५३ ते ५६ या काळात माझ्या वृद्ध मातापित्यांचे दीर्घ आजारपण व त्यातच त्यांचे निधन या कौटुंबिक आपत्तीमुळे माझे मन फार उदास झाले आणि त्या प्रकाशनाची प्रेरणाच नष्ट झाली; इतकेच काय पण या १२ वर्षांच्या दीर्घ काळात माझ्या हातून फारसे काही लिहूनही झाले नाही. तथापि काव्यासंबंधीची माझी रसिकता नष्ट झाली नाही; आणि काव्यरचनेपासून होणाऱ्या आनंदास जरी मी सांप्रत मुकलो असलो तरी नवनवीन इंग्रजी व मराठी काव्यांचा आस्वाद मी घेत आलो आहे. मला अजूनही वाटते की, स्फूर्तीचा वसंत काळ केव्हा तरी येईल आणि माझ्या काव्याचा एखादा बहार येऊनही जाईल.

हा संग्रह प्रसिद्ध करण्याची चालना नुकत्याच एका घटनेमुळे मिळाली. माझे परम कविमित्र श्री. बाबूराव ठोकळ यांनी गतवर्षी माझ्या निवडक बालगीतांचा संग्रह 'पाखरांची शाळा' या नावाने मोठ्या हौसेने प्रसिद्ध केला. त्यास केंद्रीय सरकारचे १००० रु. चे पहिले बक्षीस नुकतेच मिळाले. गतवर्षी मुंबई सरकारचेही २५० रु. चे बक्षीस मिळाले होते. हा संग्रहही वस्तुतः १२ वर्षां-पूर्वीच प्रसिद्ध व्हावयाचा होता, पण वरील कारणांमुळेच तोही त्या वेळी प्रसिद्ध होऊ शकला नाही. हा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याची निकड पुन्हा श्री. ठोकळ यांनीच माझ्यामागे लावली. माझ्या बालगीतसंग्रहाचा गौरव नुकताच झाल्याने माझ्यामध्येही पुन्हा उत्साह निर्माण झाला, आणि आता हा संग्रह प्रकाशित होत आहे. या दोन्ही पुस्तकांच्या प्रकाशनाचे सर्व श्रेय श्री. बाबूराव ठोकळ यांनाच दिले पाहिजे. त्यांचे मित्रऋण मला फेडता येणे अशक्य आहे.

रानजाई प्रसिद्ध होऊन २५–२६ वर्षे झाली. एवढ्या दीर्घ काळात मी फार थोडे लिहिले याबद्दल मला वाईटही वाटते. तथापि मध्यंतरी १–२ वर्षे काव्य-लेखनाच्या दृष्टीने बहारीची गेली. १९४६–४७ या काळात मी पुष्कळसे अभंग लिहून काढले. त्यांतील बहुसंख्य अभंग मी २–३ महिन्यांत लिहिले. असे स्फूर्तीचे लेखन माझ्या हातून पुष्कळ दिवसांनी झाले, याबद्दल मला फार आनंद झाला. एका अपूर्व व अद्‌भुत अशा काव्यानंदात मी डुंबत होतो. पण हीही वाफ लौकरच निघून गेली आणि फिरून मी गद्यप्राय व स्फूर्तिविहीन असा उरलो. 'अभंग' हे वृत्तच असे आहे की, त्याला स्पर्श होताच कविप्रतिभा आपले उदात्त व सात्त्विक रूप घेऊन त्यातून प्रगट होते. खऱ्या काव्याचा उत्कट गुण जो 'प्रसाद' तो आपोआप त्यातून उमटतो. ही सर्व पुण्याई अभंग-रचना करणाऱ्या त्या थोर संतांची. अभंगांतूनच त्यांचे भक्तिकाव्य अभंग राहिले आणि ते अमर झाले. या 'अभंग' वृत्तात काव्यरचना करण्याची स्फूर्ती मला झाली, ही मी ईश्वरी कृपा समजतो. हे अभंग 'अभंग-कूजन' या सदराखाली 'मन्वन्तर' मासिकात ४–५ वर्षांपूर्वी क्रमशः प्रसिद्ध झाले आणि आता या काव्यसंग्रहात तेच निवडक १०० अभंग समाविष्ट केले आहेत.

आता माझ्या आणखी दोन कवितांचा उल्लेख मी करू इच्छितो. त्या म्हणजे 'नांगर' व 'लिंबोळ्या' या होत. या दोन्ही कविता या काव्यसंग्रहात प्रसिद्ध होण्यापूर्वीच शालेय पाठ्यपुस्तकात समाविष्ट झाल्याने त्यांचा अभ्यास गेली कित्येक वर्षे माध्यमिक शाळांतील दहावीच्या वर्गातील विद्यार्थी व प्राथमिक ट्रेनिंग संस्थांचे विद्यार्थी करीत आहेत. 'नांगर' ही कविता मी १९४३ साली जळगाव येथे लिहिली. तेव्हा दुसरे महायुद्ध भारताच्या हद्दीपर्यंत येऊन भिडले होते. नेताजी सुभाषचंद्र बोस व त्यांची आझाद हिंद सेना यांच्या स्फूर्तिदायक पराक्रमाच्या वार्ताही थोडथोड्या कानांवर येत होत्या. अशा काळात नांगर ही कविता लिहिली. पुढे पुष्कळ वर्षांनी गिरीश यांनी अनुवादित केलेली कन्नड कवी पुटाप्पा यांची 'नांगरयोगी' ही कविता वाचण्यात आली. एस्. एस्. सी. च्या मराठी वेच्यांच्या पुस्तकातही ती समाविष्ट झाली होती. माझी 'नांगर' ही कविता व पुटाप्पा यांची कविता यांतील काही कल्पनांचे साम्य मोठे विलोभनीय वाटले आणि एका थोर कन्नड कवीच्या काव्याप्रमाणे समान विषयावर कविता लिहिण्याची मला स्फूर्ती झाली याबद्दल

फार धन्यता वाटली. माझी कविता १९४३ साली ‘ मन्वन्तर ’ या मासिकात प्रसिद्ध झाली आहे. मी हे लिहिण्याचा आणखी एक उद्देश असा की, पुटाप्पा यांच्या ‘ नांगरयोगी ’ या कवितेचे अनुकरण मी केले, असा माझ्यावर आरोप येण्याचा संभव आहे तो येऊ नये. या कवितेतील माझी जी उसनवारी आहे ती मी शेवटी प्रामाणिकपणाने कबूल केली आहे. मागे ‘ रानजाई ’ प्रसिद्ध झाल्यावर त्यातील माझ्या ‘ एकच ’ या कवितेसंबंधीही टीकाकारांनी त्या कवितेतील ‘ ही एक तुझी जळती पणती ’ या पालुपदावरून श्री. वि. स. खांडेकर यांच्या ‘घरिं एकच पणती मिणमिणती’ या कवितेची मी नक्कल केली असा आरोप केला होता. माझ्या कवितेखाली रचनाकाल न दिल्याने त्यांना केवळ या दोन ओळींच्या रचनासाम्यामुळें हा अनुकरणाचा भास झाला. मी ती कविता १९२३ साली लिहिली होती व त्या वेळीं ती ‘ आनंद ’ या मासिकात प्रसिद्धही झाली होती. खांडेकरांची ‘ पणती ’ पुढे किती तरी वर्षांनी माझ्या वाचण्यात आली.

आता ‘ लिंबोळ्या ’ कवितेविषयी थोडे आपुलकीने लिहितो. ही कविता मी बोर्डीस ( जि. ठाणे ) असताना १९४९ च्या जून महिन्यात लिहिली. त्या वेळीं तिथल्या ‘ ग्रॅज्युएट्स बेसिक ट्रेनिंग सेंटर ’ या संस्थेत मी प्राध्यापक होतो. संस्था उन्हाळी सुटी लागल्यामुळे बंद होती. विद्यार्थी अभ्यासक्रम पुरा करून परत आपापल्या गावी गेले होते. माझे बिऱ्हाड पुण्यास होते, पण मला संस्थेचे काम पाहण्यासाठी सुटीतही तेथे अडकून पडावे लागले. बोर्डी हे छोटे गाव समुद्रकाठी वसलेले अत्यंत निसर्गरमणीय आहे. तथापि मी तेथे एकटाच असल्याने मला तेथला एकलकोंडेपणा विशेषतः रात्री फारच जाणवे व अगदी भकास वाटे. अशा उदास व एकलकोंड्या मनःस्थितीत मी ‘ लिंबोळ्या ’ ही कविता लिहिली. ही कविता मी एकटाकी व जलद लिहिली. छंदात्मक तोटक्या ओळीं कागदावर भरभर उतरत गेल्या. काहीशी मुक्तछंदासारखी ही रचना झाली आणि नेहमीपेक्षा काही वेगळ्या प्रकारची काव्यरचना केली असे मला वाटले. तथापि ही कविता विशेष चांगली उतरली आहे व तीत विशेष प्रकारचे काव्यगुण आहेत, असे मला त्या वेळीं मुळीच वाटले नाही. पुढे काही दिवस ती कविता अप्रकाशित राहिली. नंतर अमळनेर येथे भरणाऱ्या साहित्यसम्मेलनाच्या निमित्ताने खानदेशस्थ कवींच्या काव्याचा एक संग्रह काढण्याची योजना आखली

गेली व मी पूर्वी जळगावास नोकरीनिमित्त असल्यामुळे मला खानदेशस्थ समजून माझ्याकडे संपादक-मंडळाने कवितांची मागणी केली. मजजवळ त्या वेळी ' लिंबोळ्या ' हीच एक अप्रकाशित कविता होती व तीच त्यांच्याकडे पाठवून दिली. कविता फार मोठी म्हणून ती घेणारच नाहीत असेही वाटले; पण तो काव्यसंग्रह ' तापीतीर ' या नावाने प्रसिद्ध होताच त्यातील श्री. प्र. के. अत्रे यांची प्रस्तावना वाचून मला सानंद आश्चर्य वाटले. प्रस्तावनेत त्यांनी माझ्या या कवितेचे फार रसिक व मार्मिक वृत्तीने रसग्रहण केलेले होते व मला स्वतःला माझ्या कवितेत जे सौंदर्य दिसले नव्हते ते दिसू लागले. त्यांनी या कवितेसंबंधी जो अभिप्राय लिहिला आहे त्यातील एक वाक्य असे आहे : ' कोणाही सहृदय सांसारिकाला क्षणभर सद्गदित आणि बेभान करून टाकणारी गणेश हरी पाटील यांची ही कविता निर्मळ अन् रसाळ काव्याचा उच्चांक आहे ! '

सारांश, पुष्कळ वेळा कवीपेक्षा रसिकच त्याच्या कवितेचे खरे सौंदर्य विशद करू शकतो हेच खरे. श्री. अत्रे यांना आवडलेल्या लिंबोळ्याच या काव्यसंग्रहाला हे नाव देण्यास कारणीभूत झाल्या आहेत. यांच्या या रसज्ञतेमुळे मला खरोखरच फार उत्तेजन मिळाले.

हा कवितासंग्रह प्रसिद्ध करताना जेवढा आनंद होत आहे, तेवढीच खिन्नता मला मनातल्या मनात वाटत आहे. माझ्या काव्यवृत्तीची जोपासना करून माझे कौतुक करणारे माझे मातापिता आज हयात नाहीत. माझ्या वयाच्या पन्नास वर्षांपर्यंत माझ्यावर त्यांचे छत्र होते आणि त्या छत्राखाली मी स्वतःला लहानच समजत होतो; आणि हे छत्र एकाएकी हरपले. माझे वडील—त्यांना मी ' दादा ' म्हणत असे—त्यांनी माझ्या काव्याची जपणूक फार केली. त्यांनी आपल्या मोहरेदार अक्षरात केलेल्या माझ्या काही कवितांच्या नकला पाहून माझ्या डोळ्यात आता अश्रू उभे राहतात आणि असे वाटते की, त्यांच्या हयातीतच हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला असता तर त्यांना किती समाधान वाटले असते !— किती अभिमान वाटला असता !

असो, या लिंबोळ्या बारा वर्षांच्या दीर्घ काळाच्या आढीत पिकत होत्या. त्या आता पक्व झाल्या आहेत. आजची नवकविता वाचणाऱ्या रसिकांना या कदाचित कडवट लागतील, कोणाला कडवट गोड लागतील, तर कोणाला हापूस-प्रमाणे गोडही वाटतील. कसेही असले तरी शहरी नवकाव्याच्या जमान्यात मी

आपल्या खेड्यातल्या लिंबोळ्या एखाद्या लहान मुलाप्रमाणे चोखण्याचा आग्रह रसिकांना करीत आहे हे मात्र खरे. प्रौढत्वी शैशवास जपणाऱ्या कविवृत्तीतून जर या लिंबोळ्यांचा आस्वाद घेण्याचा प्रयत्न केला तर त्या कदाचित आपणांस आवडतीलही.

हा संग्रह प्रसिद्ध करण्याचे कामी मला काही कविमित्रांनी व कुटुंबियांनी बरेच प्रोत्साहन दिले. कविमित्र श्री. वा. भा. पाठक व त्र्यं. ग. बापट आणि माझे जामात चि. संभाजीराव साळुंके व मधुकरराव सूर्यवंशी यांचा उल्लेख करण्यात मला विशेष आनंद वाटतो. श्री. सदाशिवराव व नारायणराव कोकाटे बंधूंनी माझ्या कविता आपल्या 'मन्वन्तर' मासिकात वेळोवेळी प्रसिद्ध करून मला प्रोत्साहन दिले, त्यांचा मी आभारी आहे. येथील महाराष्ट्र ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. कोल्हटकर यांनी माझ्याकडून गहाळ झालेली एक कविता ग्रंथालया-तून शोधून मला प्राप्त करून दिली या त्यांच्या आस्थेवाईकपणाबद्दल मी त्यांचे आभार मानणे हे माझे कर्तव्य समजतो. कलाकार श्री. मुधोळकर यांनी वेष्टना-वरील साधे पण सुंदर चित्र तयार करून दिल्याबद्दल व आनंद मुद्रणालयाचे मालक श्री. य. गो. जोशी यांनी पुस्तकाची छपाई सुबक व नीटनेटकी करून दिल्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणे
२६ जानेवारी, १९६१

ग. ह. पाटील

अनुक्रमणिका


## लिंबोळ्या

१ समर्पण १
२ घाटमाथ्यावर ३
३ स्वप्न ४
४ मैत्रिणी ६
५ पुनरागमन ७
६ उशीर उशीर ९
७ उत्कंठा १०
८ पुष्पांचा गजरा १२
९ जकातीच्या नाक्याचे रहस्य १३
१० वेळ नदीच्या पुलावर १६
११ बालयक्ष १८
१२ आजोळीं २०
१३ आजोबा २१
१४ डराव डराव २३
१५ मागणे २४
१६ बगळे २५
१७ माझी बहीण २६
१८ बाजार २७
१९ मेघांनी वेढलेला सायंतारा २८
२० मानवी तृष्णा ३०
२१ बहरलेला आकाशलिंब ३१
२२ विचारविहग ३२
२३ भटक्या कवी ३३
२४ वेताळ ३५
२५ नांगर ३७
२६ इंफाळ ४१
२७ गस्तवाल्याचा मुलगा ४३
२८ रानफुले ४५
२९ सोनावळीची फुलें ४७
३० प्रचीती ४८
३१ ते आम्ही— ५०
३२ दूर दूर कोठे दूर ५१
३३ हे स्वतंत्र भारता ५३
३४ गुरुवर्य बाबुरावजी जगताप यांस अभिवादन ५४
३५ अहो, खानदेशस्थ सन्मित्र माझे ५५
३६ त्रिपुरी पौर्णिमा ५८
३७ कागदी नावा ५९
३८ ध्येयावर ६०
३९ प्रतिभा ६२
४० जाईची फुले ६४
४१ लिंबोळ्या ६५

## अभंग-कूजन

१ देव ७१
२ महात्मा ८७
३ स्वातंत्र्य ९१
४ महायुद्ध ९६
५ काळ ९८
६ मानव १०१
७ संस्कृती १०५
८ निसर्ग १०९
९ मी ११४
१० संकीर्ण १२५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१३४९८
दा. क.

## १ : समर्पण

हे हृदयपुष्प जे अजून नव्हते फुलले
ते तूच फुलविले, तुलाच अर्पण केले

मी जरी फुलविली रानजाइची फुले
पण सुगंध त्यांचा तव हृदयी दरवळे
कशि घडून आली जादू ही, ना कळे
हे तुलाच अर्पण असोत त्यांचे झेले

ही सतार माझी प्रथम तुवा स्पर्शिली
तारेवर फिरली तव कोमल अंगुलि
कशि मंजुळ, कातर उठे तरंगावलि
जे गाणे स्फुरले, तुझ्याच हृदयी घुमले

या रुक्ष भूमिवर बीजे मी विखुरिली
ही भूमि तूच गे स्नेहजळे शिंपिली
अंकूर फुटुनि ही फुलझाडे वाढली
तुजमुळेच देवी उपवन माझे फुलले

या भरली होती करंडकी कस्तुरी
मज दौलतिची या जाणिव नव्हती परी
तव करस्पर्शने केली जादूगिरी
मन सुगंध हुंगुनि धुंद होउनी गेले

का भाव अंतरी उचंबळुनि दाटला ?
का व्याकुळ होउनि गहिवरला मम गळा ?
का फुले चांदणे ? ही कोणाची कला ?
प्रेमाचे नाते जे ठरले ते ठरले !

घडणारच नव्हते ते घडले तुजमुळे
मिळणारच नव्हते ते तू मजला दिले
मजवरी उधळिली कल्पतरूची फुले
मम जीवन केले नंदनवन तू सगळे

मी होतो जीवनमार्गावर एकला
मागून येउनी साद दिली तू मला
होऊन उषा मम पथ पुढला उजळिला
मग गाउ लागले विहंगमांचे मेळे !

तू स्फूर्ती माझी, प्रतिभा मम लाडके
किति गाउ गोडवे, किती करू कौतुके !
मी कुमुद फुल्ल तव, हे माझ्या चंद्रिके
हे तुलाच अर्पण पहिलेच नि शेवटले !

## २ : घाटमाथ्यावर

होतो मी सहचारिणीसह उभा त्या घाटमाथ्यावर
सृष्टीचे नव भव्य रूप हृदया उत्साह दे केवढा !
खाली खोल दरी, भयाण पुढती धिप्पाड मोठा कडा !
खाली जंगल दाट आणि वरती शोभे निळे अंबर

सूर्याच्या पिवळ्या उन्हात नटली कोठे गिरींची शिरे
कोठे शुभ्र जलौघ, दूर दिसती झाडीत कोठे पथ
धावे फुंकित शीट कर्कश, दिसे घाटात अग्नीरथ
जाती घालुनि शीळ भुर्र उडुनी केव्हा गुणी पाखरे

जोडीने पसरून पंख अपुले तो क्रौंच पक्षीद्वय
जाई संथ हवेत पोहत, किती ते दृश्य चेतोहर !
ओलांडून दरी निवांत बसले पाषाणखंडावर
पाठोपाठ मनोविहंगहि–असा लागून गेला लय !

तेव्हा मी म्हटले, ' प्रिये, कधितरी सोडूनि देहास या
आत्मे काय उडून जातिल असे स्वर्गास गाठावया ! '

## ३ : स्वप्न !

" मी स्वप्न असे देखिले सये मैत्रिणी
की आपण गेलो एका बागेमधि दोघीजणी

वेलींच्या मांडीवरी झोपल्या कळ्या
उघडून पाकळ्या त्यांना करि बालरवी गुदगुल्या !

गुजगोष्टि कुणा, तर जो जो गाई कुणा
तो झुळझुळ मंजुळ वारा हालवी डोलवी कुणा !

गोजिऱ्या फुलांचे खेळगडी गोजिरे
कशि गुंगत होती बाई बहुरंगी फुलपाखरे !

या लीला देखुनि मति माझी हर्षली
जणु ' जिवती ' लेकुरवाळी, फुलबाग मला भासली !

मज गोड भास जाहला कशाचा तरी
मी मधेच थबकुनि पाहे लागून ओढ अंतरी

जाहल्ये उताविळ–मन गेले लोभुनी
मी लालजर्द ' झेंडूचा ' घेतला गेंद तोडुनी

तान्हुल्यास जणु का घेत माय उचलुनी
तो हृदयी धरिला बाई हुंगिला चुंबचुंबुनी

चिमुकल्या झेंडुची बहीण जणु चिमुकली
ती ' मखमल ' गोजिरवाणी तू कुरवाळुनि चुंबिली

लावून नजर मी हसत बघे तुजकडे
तू वदलिस उसन्या रागे, ‘ ही कसली थट्टा गडे ! ’

स्वप्नात कोणत्या गुंग मती जाहली !
दोघींना ऐकू आल्या कसल्या ग गोड चाहुली ! ”

## ४ : मैत्रिणी !

लाभ तुझ्या मैत्रीचा दोन घडी मैत्रिणी
आणि अता जन्माची जाहलीस वैरिणी !

तू होउनि हाती मम हात दिला मैत्रिचा
अवचित का झिडकारुनि टाकिलास मानिनी !

जीवनपथ होतो मी आक्रमीत एकला
अभिलाषा धरिली, तू होशिल सहचारिणी !

दाखविली बोलुनि, हा काय गुन्हा जाहला ?
काय म्हणुनि माझ्यावर कोप तुझा भामिनी !

दिव्य तुझ्या प्रतिभेचा झोत मोहवी मला
होरपळुनि तरु माझा टाकिलास दामिनी !

गे आपण जोडीने मधु गीते गायिली
चोच मारुनी उडून जाशि निघुनि पक्षिणी !

कांति तुझी, डौल तुझा, नृत्य तुझे डोलवी
जहरि डंख करुनी मज, जाशि निघुनि नागिणी !

हृदयीची दौलत मी पायी तुझ्या ओतिली
मी भणंग, मी वेडा बनलो मायाविनी !

तडफडतो दिनरजनी जखमी विहगापरी
सूड कुण्या जन्मीचा उगविलास वैरिणी !

## ५ : पुनरागमन !

हो जागी प्रतिभे, सलील फिरवी वीणेवरी अंगुली
माझ्या आठवणीवरी तव मती गे पाहिजे रंगली !

होते सांज, करीत किल्‌बिल घरा येते विहंगावली
एकांती बसता तया परतुनी येतात चित्ती स्मृती
ती माझी सहधर्मिणी, सुगृहिणी माझी प्रिया मालती
तारुण्यातच ती कशी करपुनी गेली लता कोवळी ?

या वातावरणात काय फिरतो आत्मा तिचा मोकळा !
माघारा परतून आण; तुजला ती साध्य आहे कला !

झाले फूल मलूल, गंधलहरी हो लीन वायूमधे
पाहे हुंगुनि आसपास, भरुनी श्वासात आणी तिला
डोळ्यांला दिसते अजून हसरी मूर्ती तिची प्रेमला
आत्मा तीत तिचा भरून, तिजला माझ्यासवे बोलु दे

कांते, ये हसितानने जवळ ये, संकोच का हा वृथा !
मृत्यूनंतर आपला न तुटला संबंध गे सर्वथा

जो षण्मासहि जाहले न करुनी संसार माझ्यासवे
काळाने तुज तातडी करुनि तो बोलावणे धाडिले
होते ऐहिक जन्मबंध जुळले ते सर्व झाले ढिले—
नाही आत्मिक भाव मात्र; मग का मी गाळितो आसवे ?

डोळे हे पुसितो, उगाच तुजला वाईट वाटेल ना !
ही स्वप्नातिल नित्य भेट न तुझी ना भास ना कल्पना !

डोळे जाति दिपून, तेज किति हे आले अहाहा तुला !
सोन्याच्या पुतळीपरी उजळुनी आलीस तू मैथिली !
आला मंगल भाग्य–योग जुळुनी, की पर्वणी पातली !
देशी भेट फिरून, खास तुझिया प्रेमास नाही तुला !

## ६ : उशीर उशीर !

उशीर उशीर !
केलास का बाई इतुका उशीर !
शरद संपून, हेमंत संपून येताहे शिशीर !

दर्पणी माझिया डोकावू नको
जीव कासावीस करू हा नको
तुझ्या ग चंद्राचे चांदणे क्षणाचे
युगाचा भरे तिमीर

एकले चालून थकले जिणे
मागल्या जन्माची फेडाया ऋणे
फुलू दे नवीन जीवनप्रसून
गळू दे जुने शरीर

नवीन विण्याची नवी हो तार
मधुर मधुर काढी झंकार
आपुल्या प्रीतीचे नव्या प्रचीतीचे
गावया गीत मी अधीर

माझ्या फुलातिल सुगंधा होऊन ये
माझ्या गीतातिल रागिणी होऊन ये
पुढल्या वसंती होऊन वासंती
येई गे, नको उशीर !

## ७ : उत्कंठा !

ते पुरे करी नटणे थटणे
ये निघून तू लवकर सजणे

असेल वेणी तव विस्कटली
कंचुकिची वा गाठहि सुटली
भीड नको धरु तरिही कसली

असशील तशी ये तू सजणे
ते पुरे करी नटणे थटणे

त्या हिरवळल्या पथिकेमधुनी
येतेस कशी चंचल चरणी !

मोहनमाळेमधील सारे
तुटून पडतिल मणी टपोरे
पैंजणिची गळतील घुंगरे

तरि फिकिर नको तुजला रमणी
येतेस कशी चंचल चरणी !

बघ मेघ दाटले हे गगनी
असशील तशी ये तू निघुनी

सोसाट्याचा वारा सुटला
नदितीराहुन बलाकमाला
भये भरारा उडून गेल्या

ही गुरे जवळ गोठा करिती
बघ मेघ दाटले हे वरती !

घेशील दिवा तू पाजळुनी
परि मालवेल तो फडफडुनी

सुंदर तव हे विशाल डोळे
तयात न कळे काजळ भरले
दिसती या मेघांहुनि काळे

घेशील दिवा तू पाजळुनी
जाईल परी फडफड विझुनी
ते पुरे करी नटणे थटणे
ये निघून तू लवकर सजणे

तशीच अपुरी ती फुलमाळा
राहू दे, तिज गुंफायाला
वेळ कुणाला? या अवकाळा–

बघ मेघ दाटले हे गगनी
एकेक घडी जाते निघुनी!
ते पुरे करी नटणे थटणे
ये निघून तू लवकर सजणे!

[ "Do not loiter over your toilet!" ]
'गार्डनर'–रवींद्रनाथ ठाकूर

## ८ : पुष्पांचा गजरा

पुष्पांचा गजरा विशीर्ण मजला वाटेवरी आढळे
त्याची खिन्न विपन्न पाहुन दशा, त्याला करी घेतले
होता येत सुवास त्यास अजुनी, गेला जरी कोमुन
काळे जाय निघून यौवन परी मागे उरे सद्गुण

कोणाचा गजरा ? प्रमत्त तरुणी–वेणीतुनी हा पडे ?
किंवा होउन प्रेमभंग युवती याला झुगारून दे ?
शृंगारास्तव भामिनीस गजरा आणी तिचा वल्लभ
त्याने काढुनि टाकिला निज करे, की होय हा निष्प्रभ !

आता मागिल सर्व वैभव तुझे स्थानच्युता ओसरे !
बाला कोण तुला धरून हृदयी चुंबील हुंगील रे !
कृष्ण, स्निग्ध, सुगंधयुक्त विपुला त्या केशपाशावरी
डौलाने मिरवेन हासत, अशी आशा न आता धरी

घेई मानुनि तू तथापि गजऱ्या चित्ती समाधान हे
की एका कवितेत भूषित मला केले कवीने स्वये !

## ९ : जकातीच्या नाक्याचे रहस्य !

" कोणिकडे जाशी स्वारा, दिसशी का घाईत ? "
" जकातिचे नाके आहे त्या आंबेराईत ! "
बिजलीपरि चमकुन गेला—घोडेस्वार
नवल अहो, हां हां म्हणता झाला नजरेपार !

*　　*　　*

जकातिचे नाके आहे त्या आंबेराईत
बहारास आली होती दो जीवांची प्रीत

ऐका तर गोष्टीला त्या झाली वर्षे वीस
स्वार अजुनि तेथे दिसतो अवकाळ्या रात्रीस
जकातिचे नाके जळके आज दिसे ओसाड
घोटाळुनि वारा घुमवी काय बरे पडसाद !

*　　*　　*

म्हातारा नाकेवाला मल्हारी शेलार
त्याची ती उपवर कन्या कल्याणी सुकुमार !

मोहिमेस निघता तेथे स्वार करी मुक्काम
कल्याणी झाली त्याच्या जीवाचे आराम !
मोहरली अंबेराई, सरता झाला माघ
बहारास आला त्यांच्या प्रीतीचा फुलबाग

*　　*　　*

" मनहरणी, शीतळ तुझिया स्वरुपाचा आल्हाद
अमृताच्या धारा ढाळी जणु पुनवेचा चांद

आंब्याचा मोहर तैशी कांति तुझ्या देहास
जाईचे फूल तसा तव मंद सुगंधी श्वास
कल्याणी, पाहुनि तुजला फुलतो माझा प्राण
दे हाती हात तुझा तो, कर माझे कल्याण !

या आंबेराईची तु वनराणी सुकुमार
कल्याणी, सांग कधी ग तू माझी होणार ?"

* * *

"आणभाक वाहुनि कथिते, तुम्हि माझे सरदार
प्रीत तुम्हांवरिती जडली, तुम्हि भारी दिलदार
नाहि जरी बाबांच्या हे मर्जीला येणार
म्हणतातच, 'पेंढाऱ्याची बाइल का होणार ?'
पंचकुळी देशमुखांचे तुमचे हो घरदार
नाहि परी बाबांच्या हे मर्जीला येणार !"

* * *

कोण बरे फेकित आला घोडा हा भरधाव ?
जकातिच्या नाक्यापुढले दचकुन गेले राव !

"चैतपुनव खंडोबाची, ऐका हो शेलार
ध्यानि धरा लुटुनी तुमची जकात मी नेणार"
आंब्याच्या खोडामध्ये घुसला तो खंजीर
बेलगाम निघुनी गेला—गेला तो हंबीर !

* * *

पुनव करी राईवरती चांदीची खैरात
जकातिच्या नाक्याकडली लख्ख उजळली वाट
सोंग जसे ललितामधले यावे उडवित राळ
धुरोळ्यात भडकुन उठला तो टेंभ्यांचा जाळ

ओरडला गडिवरला तो टेहेळ्या झुंझार
'सावध व्हा, पेंढाऱ्यांचा आला हो सरदार !'

वाघापरि गर्जत आला, " येळकोट मल्हार !
रामराम असुचा घ्या हो मल्हारी शेलार !
पारखून घ्या तर आता हिरा आणखी काच ! "
आणि सुरू झाला नंग्या समशेरींचा नाच

" कल्याणी पेंढाऱ्याची बाइल का होणार ! "
काय असे डोळे फाडुनि बघता हो शेलार ?

" कल्याणी नेली ' एकच झाला हाहाकार
पाठलाग होऊन सुटले स्वारामागे स्वार

स्वाराच्या पाठित घुसला अवचित तो खंजीर
विव्हळला; परि नाही तो अडखळला खंबीर !

❀ ❀ ❀

तसाच तो दौडत गेला विजयाच्या धुंदीत
तसाच तो दौडत गेला मृत्यूच्या खिंडीत

" जकात ही लुटिली ज्याने प्रीतीची बिनमोल
जीवाचे द्यावे लागे मोल, " बोलला बोल
' कल्याणी जातो ! ' सोडी शेवटला हुंकार
कोसळला घोड्यावरुनी धरणीवरती स्वार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 63186 दि: 91088
क्रमांक 9886 नों. दि. 8/3/69

## १० : वेळ नदीच्या पुलावर

घटिकाभर मोटर पुलाजवळ थांबली
ती अजून घटिका स्मरणी मम राहिली
किति श्रावणसंध्या उन्हात पिवळ्या खुले !
गगनात पसरले मेघखंड रंगले

क्षितिजावर पडले इंद्रधनूचे कडे
चमचमति तृणावर नीलपाचुचे खडे
सृष्टिचे रूप रमणीय दृष्टिला पडे
आनंद अहो, आनंद भरे चहुकडे !

नुकतीच जिची का बाल्यदशा संपली
चेहरा गोल, हनु जणू उजळ शिंपली !
कुणि थोर मराठा कुळातील कन्यका
ऐटीत पुलावर बसली नीलालका

निर्व्याजपणा मोकळा निसर्गातला
संपूर्ण तिच्या चेहऱ्यावरी बिंबला
ती प्रसन्नवदना लावण्याची कळी
भावंड धाकटे खेळवीत बैसली !

खालती नदीचे जळ वाहे खळखळा
वरि गुंगुनि तारायंत्र साथ दे जळा
सृष्टिचे सानुले भाट–अशी गोजिरी
पाखरे येउनी बसली तारेवरी

मनसोक्त लागली गाऊ ओतुन गळा
मोहरली त्यांची संगीताची कळा
का स्फूर्ति एवढी उचंबळे अंतरी ?
तर कोणाची ही सांगा जादूगिरी ?

## ११ : बालयक्ष

बोलतात बाई बालयक्ष याला
कुंजातुनि आला यक्षिणींच्या

विसरून पंख इवले धवल
आला, हे नवल नाही काय ?

हासत, खेळत, बोबडे बोलत
आला हा डोलत सदनात

जाईच्या वेलीला आला का बहर
आंब्याला मोहर फुटला का ?

गाऊ का लागली पाखरे मंजुळ
वारे झुळझुळ वाहू लागे ?

अशी काही जादू घडली घरात
काय गोकुळात यशोदा मी ?

खोडकर तरी खोड्या याच्या गोड
पुरविती कोड शेजारणी

मेळा भोवताली लहान्या बाळांचा
फुलपाखरांचा फुलाभोती

' एक होता राजा ' गोष्टी या सांगत
गंमत जंमत करीत हा !

नाजुक रेशमी धाग्यांनी आमुची
मने कायमची बांधणारा

काळजीचे काटे काढून आमुची
काळिजे फुलांची करणारा

खेळकर माझा लाडका वसंत
जीवाला उसंत नाही याच्या

झोप गुर्कन लागे कशी तरी!
नाही जादूगिरी कळत ही

झोपेत गालाला पडतात खळ्या
कोण गुदगुल्या याला करी?

पंख लावूनीया गेला का स्वप्नात
यक्षिणी-कुंजात उडून हा?

तिथे यक्षिणींनी घेरला वाटत
मुके मटामट घेतात का?

कल्पवल्लरीच्या फुलाला पाहून
बाळ खुदकन हसतो का?

असा बालयक्ष माझा ग गुणाचा!
बाई न कुणाचा, माझाच हा!

## १२ : आजोळी

माझ्या मामाची रंगीत गाडी हो
तिला खिल्लाऱ्या बैलांची जोडी हो
कशी दौडत दौडत येई हो
मला आजोळी घेऊन जाई हो
नाही विकट घाट
सारी सपाट वाट
मऊ गालीचे ठायी ठायी हो

शीळ घालून मंजूळवाणी हो
पाजी बैलांना ओहळ पाणी हो
गळा खुळखूळ घुंगुरमाळा हो
गाई किल्बील विहंगमेळा हो
बाजरिच्या शेतात
करी सळसळ वात
कशा घुमवी आंबेराई हो

कोण कानोसा घेऊन पाही हो
कोण लगबग धावून येई हो
गहिवरून धरून पोटी हो
माझे आजोबा चुंबन घेती हो
लेक एकुलती
नातु एकूलता
किति कौतूक कौतूक होई हो

## १३ : आजोबा

आजोळ माझे लहान गाव
'कळंब' आहे तयाचे नाव
नदी 'अश्विनी', 'माणिक' ओढा
गावशिवारा घातला वेढा

ओढ्याच्या काठी मळा मामाचा
पडाळ छोटी, छोटा बगीचा
मायाळू भारी माझे आजोबा
म्हणती त्यांना सगळे 'बाबा!'

आंघोळ त्यांची भल्या सकाळी
गोपीचंदन लाविती भाळी
नारायणाला हात जोडिती
पूजा करिती, पोथी वाचिती

ऐन दुपारी आंब्याखालती
घोंगडीवरी अंग टाकिती
घायपाताचा वाक घेऊनी
दोर वळिती पीळ देऊनी

करडे पाटीखाली झाकिती
गुरा वासरा पाणी पाजती
शेण काढुनी झाडिती गोठा
स्वच्छ ठेविती अंगण, ओटा

तिन्ही सांजेला येता माघारी
गुरे दावणी बांधिती सारी
पाठीवरुनी मुक्या जीवांच्या
हात फिरतो प्रेमळ त्यांचा

पाहुणा कोणी येता दुरूनी
बोलती त्याशी तोंडभरूनी
गोष्टी सांगती देवाधर्मांच्या
अभंग गाती तुकारामाचा

देवाचे नाव सदा तोंडात
झोप तयांना लागते शांत
आजोबा माझे भारीच गोड
त्यांच्या प्रेमाला नाहीच जोड !

## १४ : डराव डराव !

डराव डराव ! डराव डराव !
का ओरडता उगाच राव ?

पत्ता तुमचा नव्हता काल
कोठुनि आला ? सांगा नाव

धो धो पाउस पडला फार
तुडुंब भरला पहा तलाव

सुरू जाहली अमुची नाव
आणिक तुमची डराव डराव !

बटबटीत डोळ्यांचे ध्यान
विचित्र तुमचे दिसते राव !

सांगा तुमच्या मनात काय ?
ही घ्या छत्री, ही घ्या नाव

जा गाठा जा अपुला गाव
आणि थांबवा डराव डराव !

## १५ : मागणे

" हात तुजला जोडितो देवबाप्पा
सुखी माझ्या तू ठेव मायबापा
करी भाऊला परीक्षेत पास
त्यास नाही देणार कधी त्रास !

ताइ माझी किति शहाणी हुषार
तिला मिळु दे बाहुली छानदार
मित्र बाळू धरि अबोला रुसूनी
जुळव गट्टी रे आमुची फिरूनी

करी किरकिर तान्हुले पाळण्यात
काम आईला सुचेना घरात
उगे त्याला कर, लागु दे हसाया
फार होतिल उपकार देवराया ! "

## १६ : बगळे !

कुणिकडे चालले हे बगळे
रांगेत कसे उडती सगळे !

नदी वाहते संथ खालती
जळी ढगांच्या छाया हलती
तटी लव्हाळे डोलडोलती
वर कुणी उधळिली शुभ्र फुले ?

पाय जुळवुनी, पंख पसरुनी
कलकल कलकल करीत मधुनी
कुठे निघाले सगळे मिळुनी
पडवळापरी किति लांब गळे !

वाटे सुटली शाळा यांची
शर्यत सुटली की पळण्याची !
यात्रा भरली की पक्ष्यांची ?
तिकडेच चालले का ? न कळे !

## १७ : माझी बहीण

मला आहे धाकटी बहिण नामी
नाव ' कमला ' ठेविले तिचे आम्ही
सदा हसते नी सदा खेळते ती
कधी रडते नी कधी हट्ट घे ती

बाळ माझी ही गुणी अन् शहाणी
तुम्ही जर का देखाल न्याहळोनी
कौतुकाने बोलाल, ' ह्या मुलीला—
कुठुनि इतुका हो पोक्तपणा आला ! '

तशी आहे ती द्वाड अन् खट्याळ
तुम्हा भंडावुन नकोसे करील
आणि तुम्ही बोलाल, ' अशी बाई,
मूल हट्टी पाहिली कधी नाही ! '

सुटी माझ्या शाळेस जो न होते
तोच माझे मन घरा ओढ घेते
धरुनि पोटाशी बाळ सोनुलीचे
मुके केव्हा घेईन साखरेचे !

अशी वेल्हाळी लाडकी गुणाची
नाहि आवडती व्हायची कुणाची ?
मैत्रिणींनो, कधि घरा याल माझ्या
तुम्हांला मी दावीन तिच्या मौजा !

## १८ : बाजार

बाजार आज गावचा पहा वाहतो
खिडकीत उभा राहुनी मौज पाहतो
हा गाड्यांनी गजबजला गाडीतळ
किति गडबड, गर्दी, गोंगाट नि गोंधळ !

बाजारकऱ्यांची रहदारी ही सुरू—
जाहली, चालती पहा कसे तुरुतुरु !
ध्वनि खुळखुळ घुंगुरमाळांचा मंजुळ
जणु मला बाहतो, करितो मन व्याकुळ

ही शेतकऱ्यांची मुले शिवारातली
घालीत शीळ, मारीत उड्या चालली
उगवेल सणाचा दिवस उद्या पाडवा
पैरणी नव्या, पोषाख हवा नवनवा

काकड्या लांब, गरगरित गोल टरबुजे
गुळभेली, साखरपेटि, गोड खरबुजे—
आणिती गाढवे पाठीवर वाहुनी
कशि दुडक्या चाली येती गिरणेहुनी !

जरि सावलीत मी, तहान किति लागली
खायला कलिंगड-खाप लाल चांगली !
मन गेले गेले वाऱ्यावर वाहुनी
मज बाजाराला जाऊ द्या हो कुणी !

## १९ : मेघांनी वेढलेला सायंतारा

चमूचमणारा । घनवेष्टित बघ हा तारा

तारा-जननी संध्या रमणी
तरणी-विरहे रडे स्फुंदुनी
आरक्त छटा उमटे वदनी
बघुनि वेल्हाळा । गहिवरुनि वदे या बोला

" बाळ सोनुले उघडे पडले
कोण अता मायेचे उरले ?
किति दिसताहे मुख हिरमुसलें !
भिउ नको बाळ । मी करिन तुझा सांभाळ

पुत्र कुणाचा ? दावित सकला
मोहक हा तव वदनतजेला
एक एक गुण जणू तिकडला
साठला वदनी । वाटते लाडक्या बघुनी

तळपत होते जोवर गगनी
मुठीत होती सगळी अवनी
खळ दिपले स्वारीस पाहुनी
कुणाची छाती । आपणा छळाया नव्हती

तेच पहा त्यांच्या माघारी
अनाथ अबला मला पाहुनी
बालवय तुझे हे ओळखुनी
चोहिबाजूंनी । भिवविती नीच घेरोनी

मेघखळांची कृष्ण साउली
बाळा, तुझिया भवती पडली
दिव्य वपू तव झाकिल सगळी
परि तुझें तेज । आणिते तयांना लाज

धैर्य न होई स्पर्श कराया
दचकुन बघते बघ घनछाया
' अवचित येइल की रविराया '
दरारा हाही । तव रक्षण करितो, पाही

घनमण्डळ काळासम भासे
त्यात धैर्य जणु तुझे प्रकाशे
वीरकुळाला हे साजेसे
भिउ नको बाळ । मम अंकी नीज खुशाल !

## २० : मानवीं तृष्णा

हा आकाश–विकास मूर्त गमतो उत्कर्ष नेत्रोत्सव
तारा–पुञ्ज, दिवाकर, ग्रह, शशी त्याचे असे वैभव

ते आम्ही बसतो पहात हृदयी होऊनिया विस्मित
तारामण्डळ व्योमभूषण कसे व्हावे परी अंकित !

काढी मानव कष्ट सोसुन हिरे का खोल खाणीतुन
मोती आणिक सागरातुन, मला त्याचे कळे कारण !

## २१ : बहरलेला आकाश-लिंब !

" पर्णश्रुती तरुवरा, तव लक्षसंख्य
हे डोलती धवल हूल तयीं सुरेख !
नक्षत्रपुञ्ज नयनोत्सव अंबराचे
की लोल हे झुलति लोलक झुंबराचे ! "

## २२ : विचारविहग

हृदयस्थानी येउ लागती थवे विचारांचे
दुरून त्या माहेर वाटले केवळ शांतीचे !

एक एक मारून चालला चंचु परी परता
विचारविहगा येइ एवढी कोठुनि चंचलता !

काकुळती येऊन फोडिली हाक पाखरांनो
'यारे या, गाउ द्या तुम्हांवर गीत गोजिऱ्यांनो !'

परंतु नव्हते हृदयच जेथे स्थिरतेचे धाम
स्वैर विचारां कसा मिळावा तेथे आराम

जीवनमार्गांवरून संतत भ्रमण असे यांचें
हृदयाच्या छायेत बसाया मन यांचे नाचे !

भविष्यवादी दूत जणू सैराट हिंडतात
या दूतांच्या संदेशाने काव्यें होतात

## २३ : भटक्या कवी !

मी उदास होउनि सहज मनाशी म्हणे
'ये मुशाफिराचे का हे नशिबी जिणें ?
घरदार सोडुनी प्रिया, लाडकी मुले
हिंडतो खुळा मी, काय मला लाभले ?'

किति विचार आले गेले हृदयांतरी
पाखरे जशी चिंवचिंवती वृक्षावरी
विमनस्क होउनी चढलो मी टेकडी
सोडुनी श्वास चहुकडे दृष्टि फेकली

पश्चिमेस दिसला भटकत गेला रवी
ती म्लान मुखश्री मन माझे मोहवी
पाहिला नभी मी मेघखंड हिंडता
खग दिसला गिरक्या घेत तिथे एकटा !

ये वाहत सरिता डोंगररानातुनी
बागडता दिसली निर्झरबाळे गुणी
हा वायु विचरतो भुवनी वेडापिसा
परि तऱ्हेतऱ्हेचे सूर काढितो कसा !

ग्रहमाला करिते भ्रमण रवीभोवती
संगीत गूढ निर्मिते तयांची गती
सगळेच विश्व हे दिसे प्रवासी मला
खुललेली दिसते तरीच त्याची कळा !

जाहले हिमाचे प्रळय, आर्यपूर्वज
ध्रुव सोडुन भटकत फिरले, स्मरले मज
या देवभूमिचा लाभ त्यास जाहला
गाइले वेद ते ठावे तुजला मला

ख्रिस्तादि महात्मे नसते जर भटकले
पाजळते का जगि धर्मदीप आपले !
ते जगत्प्रवासी गल्बत हाकारुनी
भटकले, जाहले नव्या जगाचे धनी

ते आङ्ग्लकवी ज्या म्हणत ' सरोवर-कवि '
गाइली तयांनी निसर्गगीते नवी
तो अमेरिकेचा भटक्या कवि ' डेव्हिस '
का त्याची कविता भुलवी मम मानस ?

मग मीच कशाला विशाद मानू तरी
भटकेन जगावर असाच जिप्सीपरी !
हातात शिदोरी, खिशात कविता-वही
जाहलो प्रवासी पहावया ही मही

त्या क्षितिजाजवळिल निळ्या टेकड्यांकडे
ही वाट जात घेऊन वळण वाकडे
तिकडेच निघालो वाजवीत पावरी
या अद्‌भुततेची काय कथू माधुरी !

## २४ : वेताळ

" स्मशानवासी मी आहे भूतपाळ वेताळ
वर्ण असे माझा काळा, मन माझे वेताल !
कडकडते बिजली तैसे माझे हास्य कराल
खदिरांगारासम डोळे जळजळ करिती लाल !
कैलासेश्वर सांबाचा आहे गण मी ख्यात
समंध भूत पिशाच्चांचा राजा मज म्हणतात
उत्तररात्रीं तरुछाया लंबमान दिसतात
देह दिसे माझा तैसा–धड माझे गगनात !

❀ ❀ ❀

भीषणता जेथे अपुला गाजविते अधिकार
संचरतो तेथे माझा देह भैरवाकार
थोर थोर वटवृक्षांच्या थंडगार छायांत
धरून पारंब्यांना मी झोके घेतो शांत !
विहीर शेतातिल किंवा परसामधला आड
घुमून त्यात कधी देतो पारव्यांस पडसाद
दबा धरूनी रात्रीचा बसतो मी वेशीत
चुकार कोणी जो भटके त्यास करी भयभीत !
चिलीम विझवुनि पेंगाया लागे चौकीदार
खडा पहारा जागवितो त्याचा घेउनि भार
ललकारी देउनिया मी गस्त घालितो गस्त !
वेसकराची ऐकुनि ती छाती होई धस्स !
सातिआसरा, बहिरोबा, म्हसोबाहि महशूर
जेथ तिव्हाट्यावर बसती फासुनिया शेंदूर
फेरी करुनी मी येतो रात्रीचा तेथून
विकट हास्य करितो त्यांच्या मौजा मी पाहून !

* * *

लोक उतारे तिन्हिसांजा ठेवितात उतरून
पाळत ठेवुनि त्यांवर मी नेतो ते चोरून
डोकावुनि काळ्या डोही पाडी मी प्रतिबिंब
घामाने होउनि जाई झ्याडाची तनु चिंब
रानपठारावर केव्हा जाउनि मांडी ठाण
शीळ फुंकुनी घुमवीतो आसपासचे रान
भूते मग होती गोळा तेथे चोहिकडून
हसती बागडती माझ्या भवती फेर धरून !

❀ ❀ ❀

गावशिवेवरती आहे वटवृक्षांचा पार
अवसेच्या रात्रीं अमुचा होत तिथे संचार
डमरूच्या तालावरती तांडव करितो सांब
आणि घालितो आम्हीही धुमाकूळ बेफाम
नाचत तालावर आम्ही येतो उडवित राळ
लोळ विजेचा उठे तसा भडकुन त्याचा जाळ
उजेडात दिसती अमुचे चेहरे भेसूर
बघेल जो त्याचे व्हावे हृदय भयाने चूर
पाजळुनी केव्हा माझे भाईबंद हिलाल
जलसा करिती गाऊनी कर्कश अन् बेताल
कभिन्न काळोखात अशा भीषण देखाव्यास
बघेल जो कोणी त्याला मूर्च्छा येइल खास ! ”

## २५ : नांगर

जग सगळे बनले रणकुण्डच भीषण
पातला काय प्रळयाचा निकट क्षण !
लक्षावधि पडती जीवांच्या आहुती
नररुधिराच्या खळखळा नद्या वाहती !

मानवते, का तू बडवुनि घेशी उर ?
उलटले तुझ्यावर तुझेच भस्मासुर
जी दिलीस भौतिक शास्त्रांची खेळणी
त्यांचिया करी, ती शस्त्रे झाली रणी !

संहार होत जो आज पुरा होउद्या
शांतीची किरणे दिसणारच ती उद्या
परतंत्र भारता, शस्त्रहीन तू पण
तव कवण महात्मा करील संरक्षण ?

भडकली आग कुणिकडे ! तयाची धग--
लागून इथे करि जीव कसा तगमग !
माजला भयानक कोलाहल अंतरी
मी दूर दूर भटकलो पिसाटापरी !

शेवटी गाठिली घारकड्याची दरी
विमनस्क बैसलो एका दरडीवरी
संध्येची होती सौम्य उन्हे पांगली
अन् घारकड्याची दीर्घ पडे साउली

त्या सावलीत लाकडी जुना नांगर
कुणि हाकित होता बळिराजा हलधर
खांद्यावर आसुड, हालवीत खुळखुळा
घालीत तास तो सावकाश चालला

फोंडीत ढेकळे फाळ जसा तो फिरे
बैलांच्या नावे गीत तयाचे स्फुरे
त्या श्रमिगीतातिल आशय का समजला ?
' पिकवीनच येथे मी मोत्यांचा मळा ! '

तुम्हि याला भोळा खुळा अडाणी म्हणा
तुम्हि हसा बघुनि या दरिद्रनारायणा !
बळराम आणि बळिराजा यांच्या पुन्हा
मज याचे ठायी दिसल्या काही खुणा

हा स्वयंतुष्ट करि जगताचे पोषण
होऊन ' हलायुध ' करितो पण रक्षण
जरि भोळा, याच्या औदार्याची सरी
येणार न कोणा कुबेरासही परी

जाहला कशाचा गर्व तरी आपणा ?
की ओळखल्या सृष्टीच्या खाणाखुणा !
सृष्टीची कोडी सोडविता शेवटी
छांदिष्ट बंधुंनो, भ्रमिष्ट झाली मती

त्या मयासुराची दावुनि कारागिरी
तुम्हि मानवतेची फसगत केली खरी !
किति तुम्हांस कुरवाळुनी लाविला लळा
पण आपण भाऊ कापू सजलो गळा

एकान्त शांत शेतात पहा हलधर
हा ध्येयनिष्ठ हाकितो कसा नांगर !
हा दिसे दरिद्री, चिंध्या अंगावरी
गरिबांस घालितो खाऊ पण भाकरी

गंभीर, धीर हा स्थितप्रज्ञ का ऋषी !
मानिलें ध्येय, कर्तव्य एक की 'कृषि'
घारीपरि घाली विमान घिरट्या वर
ये ऐकू याला त्याची नच घरघर !

ते बॉम्ब घटोत्कचनाशक शक्तीसम
पण स्फोट व्हावया ठरले ते अक्षम
रणगाड्यांचा ये ऐकू नच गोंधळ
घनगर्ज गर्जती तोफा-हा निश्चळ !

त्या रणनौका, ते छत्रीधर सैनिक
ते पाणतीर, काही न तया ठाउक
या संहाराचा प्रेरक अग्रेसर
त्या माहित नाही कोण असे हिटलर !

क्रांतीची त्याने कदर न केली कधी
काळासहि त्याने जुमानले नच कधी
ही युद्धे म्हणजे घटकेची वादळे
का नांगर याचा थांबणार त्यामुळे !

लोटली युगे किति, तो न थांबला कधी
येतील युगे किति, थांबेल न तो कधी
होतील नष्ट शस्त्रास्त्रे केव्हातरी
हा अखंड, अक्षय, अभंग नांगर परी !

जो जगन्नियंता विश्वंभर ईश्वर
धनधान्ये करितो समृद्ध जग सुंदर
हे पवित्र त्याचे प्रतीक हा ' नांगर '
वंदितो त्यास जो बळिराजा हलधर !

लिं बो क्या : ५१
क्रमांक ...१०६५... नों. दि. ...५/३/६७

## २६ : इंफाळ

" इंफाळ–जंगलातल्या चिमुकल्या फुला,
मोकळे करुनि सांगतो मनोगत तुला
एकलेपणा मज असह्य हा जाहला
तू विरंगुळा एकल्या जिवाला मला !
मी जखमी होउन खंदकात या पडे
मज टाकुनि गेले बांधव मम कुणिकडे ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९३४९८
दा. क.

चहुबाजू धूसर दिसति नागटेकड्या
उद्‌ध्वस्त त्यांमधे नागांच्या झोपड्या
ओतितो आग तोफांचा भडिमार हा
की प्रलयंकर भूकंप होत हा महा !
सर गोळ्यांचे सोडिती यंत्रबंदुका
कित्येक चाटुनी जाती या खंदका
चढउतार भारी, किर्र रान भोवती
बेधडक त्यातुनी रणगाडे धावती
हे वनदेवीच्या मुला, नवल हे पण
या वणव्यातुन वाचलो कसे आपण ?

घरदार सोडुनी लष्करची चाकरी
का धरिली, ते तुज कसे सांगु मी तरी ?
मी कृष्णा–खोऱ्यातला मराठा गडी
या ब्रह्मी आघाडीत घेतली उडी
बोलोत शिपाई भाडोत्री मज कुणी
लढतोच तरी तळहाती शिर घेउनी
हा कुणी कुणास्तव जिंकायाचा लढा
मज याचा अजुनी झाला नच उलगडा !

इंफाळ दिशेचा सर्द वात वाहतो
कुजबुजुनी कानी काय मला सांगतो ?
रणघोष ‘ चलो दिल्ली ’ चा हा ऐक रे !
‘ जयहिंद ! ’ हाक तव बंधूंची ऐक रे !
ते शत्रू नाहित—हिंदपुत्र फाकडे
ते सज्ज जाहले जाया दिल्लीकडे !
स्वातंत्र्यरवीला द्यायाला अर्घ्य हे
रक्ताला आहे बोलावित रक्त हे !

इंफाळ दिशेचा वारा हे हृद्गत—
सांगून म्हणे, ‘ ये, तुझे असो स्वागत ! ’
ही हाक कुणाची ? मातेची हाक ही !
ऐकून संचरे मनी चेतना नवी

घायाळ पाखरू तडफड तडफड करी
पण येत उडाया नाही त्या अंबरी !
असहाय तसा रे झालो मी सर्वथा
ही सांगु कुणा मी मनची माझ्या व्यथा !

सह्याद्री माझा माहित नाही तुला
नसशील ओळखत रानजाइच्या फुला
तुज पाहुनि होते त्यांची मधुर स्मृती
रे हास हास ! तव कौतुक करु मी किती !

जखमेतुनि गेले गळुनि रक्त घळघळा
रे थकलो मी, नच अधिक बोलवे मला
ती येइल गाडी ‘ ॲम्ब्युलन्स ’ अवचित !
मज घेउन जाइल, होइल ताटातुट !

## २७ : गस्तवाल्याचा मुलगा

चांदणे फिकटले, तिनकांडे मावळले
तरि पाय आमुचे घरास नव्हते वळले

लागल्या व्हावया लांब लांब तरुछाया
जणु काय पसरिती भुताटकीची माया !

क्षितिजावर नव्हती अजुनि 'चांदणी' आली
पक्ष्यांची किलबिल सुरूहि नव्हती झाली

अद्याप जगाची निद्रा नव्हती सुटली
परि झोप अम्हांला निशाचरांना कुठली !

चावडीपुढे रंगात तमाशा आला
करि बहार शाहिर होनाजीचा चेला

लावण्या, गौळणी ऐकुनि मानस रिझले
घटकाभर अमुचे स्मरण घराचे बुजले

'धनि रामपारबी व्हाया नव्हं का आला !
तांबडं फुटलं,' धर्माजी बोलुनि उठला

मग बोलत बोलत घरा परतलो आम्ही
परि कान ऐकती ललकाऱ्या त्या नामी !

अंगणात छाया दिसे घराची पडली
जणु त्यावर त्याची माया-पाखर जडली

त्यातून प्रगटली एक चिमुकली मूर्ती
हळुहळू यावया लागे पुढती पुढती

थरकले हृदय, थबकले आमुचे पाय
हा भुताटकीचा चमत्कार की काय !

धर्माजी बोले, ' घ्या देवाचे नाव
भेटेल तो जर का त्यावर अपुला भाव !

डावलू नका जी, बघा तरी न्याहळुनी
सांगुन का होते कधि देवाची करणी ! '

तो ' बा–बा–बा–बा ! ' अशी बोबडी वाणी
ती बाळमूर्ति मग बोले मंजुळवाणी

आश्चर्य–भीति–हर्षाचे–वादळ उठले
क्षणभरच मनी, मग संशय सारे फिटले

धावलो पुढे, ओरडलो, ' माझ्या बाळा ! '
पोटाशी धरुनी घट्ट, चुंबिले त्याला

' तू ' बालक होउनि देवा, देशी भेटी
इतुके का आहे पुण्य आमुच्या गाठी ! '

धर्माजी दुरुनी पडला त्याच्या पाया
गहिवरुनी हृदयी लागे नेत्र पुसाया

तो सताड उघडे दिसे घराचे दार
माउलीस होती झोप लागली गाढ !

## २८ : रानफुले

मन फुले हर्षुनी रानफुले पाहुनी
सृष्टिची मुले साजिरी गोजिरी गुणी !
शिकविले यांस हो गोड हसाया कुणी ?
मिळविले सुखाचे निधान हे कोठुनी ?

ही इथे डोलती पिवळी 'तरवड फुले'
निष्पर्ण 'किरळ' शेंदरी फुलांनी खुले
भुइवरी उमलली शुभ्र 'कळइची' फुले
कुणि यक्षिणिने का मोती हे विखुरले!

डोकावति मधुनी चंद्रापरि 'चांदिल'
तर कुठे झळकती झेंडूंचे मंदिल !
शोभती किती जांभळी निळी 'रुइफुले'
की सृष्टिसतीच्या कानांतिल चौफुले !

तृणफुले उमलली ठायि ठायि चिमुकली
नावेही त्यांची अवगत नसती मुळी
क्षण फुलून क्षणभर दुसऱ्यांना फुलविणे
का यास्तव यांचे क्षणभंगुर हे जिणे !

" रमतात यक्षिणी का तुमच्या संगती !
ही फुलपाखरे तुमच्याशिच रंगती
किति सृष्टीची करमणूक करता तुम्ही
चर्येवर तुमच्या गोड हसू नेहमी !

भावंड एक मी दुःखी कष्टी, मला
हसवून एकदा फुलवा जीवनकळा !
सहवास सुखाचा तुमचा मज लाभला
तर फुलून गाणे गाइल माझा गळा !"

## २९ : सोनावळीची फुले

मी हिंडत होतो स्वैरपणे एकदा
गगनात विहरतो मेघ जसा एकटा
तो एकाएकी रानी दिसला मला
तो पिवळा पिवळा सोनावळिचा दळा

ओढ्याच्या काठी तिच्या फुलांचे थवे
किती डोलत होते मंजुळ वाऱ्यासवे !
सुरतरंगिणीपट चमचम करितो निशी
मज शोभा दिसली सोनावळिची तशी

हलवीत आपुली शिरे गुंग नर्तनी
पाहिली फुले लक्षावधि एक्या क्षणी
त्या खळखळ लाटा नाचत होत्या जळी
मज 'सळसळ' यांची गोड अधिक वाटली

परिवार बघुनि हा आनंदी सोबती
मम कविच्या हृदयी हर्षा नुरली मिती
मी सूक्ष्म विचारी गढलो, नकळे परी
कोणती साठली दौलत मम अंतरी !

विमनस्कपणे वा शून्य मने कैकदा
आरामखुर्चिवरि उगीच बसतो, तदा–
नाचती फुले ती अंतर्दृष्टीपुढे
एकांतपणाचे श्रेय अहा केवढे !

तेधवा हृदय मम हर्षे ओथंबते
अन् सोनावळिच्या फुलांसवे नाचते !

## ३० : प्रचीति

इथून पश्चिमेकडे भरारि घे मनोविहंग
तिथेच दंग होत तो, नका करू समाधि–भंग !

म्हणाल दृश्य कोणते
तयास भूल पाडिते

समोर पाहिलेत का विशाल विश्व नीलरंग !

अथांग सिंधु होत हा निळ्या नभात एकरूप
परेश याच दर्पणी बघे स्वरूप विश्वरूप

विलीन जीव हो शिवात
उमा जशी सदाशिवात

अशी प्रचीति येउनी असूप ये मना हुरूप

लुटून घेति लोचने प्रसन्न नीलिमा प्रशांत
गमे शरीर न्हाउनी बने तजेल नीलकान्त !

किती पहा पुढे पुढे
किती पहा पलीकडे

असीम जे, अगाध जे, कुठून ते असेल सान्त ?

मऊ नि आर्द्र सैकती उभा न मीच दीर्घकाल
उभ्या सदाच नारळी, सदा उभेच उंच ताल !

बुडी हळूच घे जळी
कसा रवी, कसा शशी !

सहर्ष हे न्यहाळिती अशी सुरम्य हालचाल !

जिथे नभात मीनला समुद्र त्या कडेवरून
धरून ओळ चालली सलील तारवे दुरून !
सरोवरात राजहंस
सफेत हालवून पंख
मजेत पोहती जणू, हरेचि भान हे बघून !

कुठून चालली कुठे? मनास होत गूढ भास
त्यजून या जगा सुरू नव्या जगाकडे प्रवास
बघा शिडेच पांढरी
अदृश्य नाखवे परी
बसून तारवात त्या अधीर मी फिरावयास !

अलीकडील बंदरा कशास खुंटवून नाव
मुशाफिरा विरामसी, तुझे पलीकडेच गाव
हळू हळू पुढे पुढे
तुझेहि तारु जाउ दे
अनंत नीलिमेत त्या कधीतरी मिळेल ठाव !

## ३१ : ते आम्ही-- !

फुलबाग फुलवितो-ते आम्ही फुलमाळी
गोकुळा भुलवितो-ते आम्ही वनमाळी
स्वचांप निर्मितो-ते आम्ही भिंगारी
रंगवितो क्षितिजे-ते आम्ही रंगारी

ताऱ्यास उजळितो परेश ज्या जादूने
वाऱ्यास घालितो फुंकर ज्या जादूने
ती जादू अमुच्या भरली अंतःकरणी
ती घडवी अमुच्या करवी अद्‌भुत करणी

बीजांना आम्ही वृक्षरूप देणारे
कलिकांना आम्ही पुष्परूप देणारे
बालांना आम्ही नारायण करणारे
ते शिक्षक आम्ही धन्य जगी ठरणारे

देतात अम्हांला देव दिव्य निज अंश
उद्धरितो आम्ही अवघा मानव-वंश !

## ३२ : दूर दूर कोठे दूर !

दूर दूर कोठे दूर
मंजुळ मंजुळ चाले सूर
नकळे का ये भरून ऊर
नयनी चाले अश्रूपूर !

निळ्या क्षितिजी टेकड्या निळ्या
कोणत्या स्वप्नी पेंगती खुळ्या
त्याच सुरांनी भारल्या गेल्या
भानावर ना अजून आल्या

गूढ गूढ भारी गूढ
बावरले मन, झाले मूढ
कोण करी तर हे गारूड !
कुण्या जन्मिचा उगवी सूड !

अज्ञात कोणी अद्‌भुत कोणी
वाजवी पावा जादूची राणी
निळ्या क्षितिजी रांगती छाया
त्याच सुरांनी भारल्या गेल्या

भूल भूल अवघी भूल
न कळे कोणाची चाहूल !
त्याच दिशेला हे पाऊल
चालू लागे हलकेफूल !

अंधार मागे  अंधार पुढे
चाललो आहो  आम्ही बापुडे
भेटो न भेटो  जादूची राणी
ऐकत चालू  अद्‌भुत गाणी !

## ३३ : हे स्वतंत्र भारता --

आज घरा परतुनि ये देवता स्वतंत्रता
हाच खरा पाडवा तुझा स्वतंत्र भारता

हा अशोकचक्रांकित
राष्ट्राचा ध्वज पवित्र
फडकत डौले नभात
हृदय ये उचंबळून हर्षभरे पाहता

ध्येयास्तव जे लढले
राष्ट्रवीर आत्मबले
प्राण तुला अर्पियले
थोर हुतात्म्यांचे करि स्मरण ही कृतज्ञता

नौरोजी, टिळक, दास
लाल, जवाहर, सुभाष
तप यांचे ये फळास
राष्ट्रपिता गांधींची होत ध्येय-पूर्तता

आज तुझे शिर उन्नत
आज तुझे भाग्य उदित
आज तुझे हृदय मुदित
घोष 'जयहिन्द' करू सतत, हीच धन्यता !

## ३४ : गुरुवर्य बाबूरावजी जगताप यांस अभिवादन

प्रांजळ भावे तुमच्या चरणी अर्पित हे अरविंद,
करितो मी सानंद तुम्हांला अभिवादन ' जयहिंद ! '

खडकावरती करुनि मशागत तुम्ही फुलविला बाग
अपूर्व तुमची सेवा, गुरुजी अपूर्व स्वार्थत्याग

तुम्ही उधळिली चैतन्याची किरणे, जाती दूर
आणि उजळिला शिवरायाचा महाराष्ट्र महशूर

पवित्र तुमच्या तपे निर्मिले हे शिक्षणमंदीर
शिवरायाचे नाव ठेवुनी तुम्ही राखिले ब्रीद

वसिष्ठ–सांदीपनीसारखे ' शिक्षक ' आपण थोर
कितीक छोटे तुम्ही शिकविले राघव, नंदकिशोर

तेजस्वी शुक्रासम तुमचे प्रसन्न जीवन गोड
सुगंध देते अखंड झिजुनी जीवन–चंदन–खोड

शिक्षण-क्षेत्री आघाडीवर सज्ज सदा राहून
समाज जागृत करण्या झटला उदंड कष्ट करून

पूर्ण साठ पानांचा लिहिला ग्रंथ तुम्ही यशवंत
शतपत्रांचे सुवर्ण-लेखन पूर्ण करो भगवंत

फिटेल न कधी ऋण तुमचे जरि लक्ष अर्पिले होन
करून घ्यावा गोड आमुचा हा बोरांचा द्रोण !

## ३५ : अहो, खानदेशस्थ सन्मित्र माझे !

अहो, खानदेशस्थ सन्मित्र माझे,
करी प्रेमभावे तुम्हा वंदने
तुम्हांला पुन्हा भेटुनी जीव धाला
मनी पौर्णिमेचे पडे चांदणे

मला अर्पिला शुद्ध सौहार्द ठेवा
अहो, धन्य मी भाग्यशाली खरा !
वृथा दूर सोडून गेलो तुम्हांला
करावी क्षमा दीन या पाखरा

तुम्ही लाविला वृक्ष जोपासिला तो,
किती भव्य आता दिसू लागला
इथे अश्रया पातले बाळपक्षी
फुटू लागला गोड त्यांना गळा

अशा भव्य वृक्षी कुणी एक पक्षी
बसे येउनी दूर देशाहुनी
पुरा रंगुनी जाय मेळ्यामधे या
कला आपली दाखवी गायनी

कुठे देश त्याचा, कुठे दूर कोटे
कुठे राहिले दूर मातापिता !
लळा लाविला, कोडकौतूक केले
सदा राहिला दक्ष त्याच्या हिता

तयाचे इथे अल्प वास्तव्य झाले
मधु स्वप्न गेले क्षणी भंगुनी
पिसारा उभारून गेला उडूनी,
तया मारिली हाक सांगा कुणी ?

तुम्ही थोर आचार्य बंधूच माझे
अहो, तूमच्या काय वानू गुणा !
तुम्ही गाळिला घाम, उद्योग केला,
मला अर्पिला मात्र मोठेपणा

अहो, छात्र झाला तुम्ही शिक्षकांनो,
शिकाया नवाध्यापनाची कला
तुम्हा आमुच्यापासुनी ध्येय–दीक्षा
मिळाली, किती स्फूर्ति सांगा मला ?

अहो, खानदेशस्थ सन्मित्र माझे,
तुम्ही लीन शालीन साधेसुधे
जरीला मऊ शुभ्र कापूस तैसा
ऋजू भाव शोभे स्वभावामधे

जणू साखरी मेहरूणीच बोरे
अशी माधुरी भाषणी आर्जवी !
मनाचे तुम्ही मोकळे, संपदा ही
गुणांची, कुबेरासही लाजवी

तुम्ही सर्व पाटील द्यायास आला
'मराठा समाजास' संजीवनी

जयांनी जुना हाकिला गावगाडा
असे गावचे थोर राजे गुणी!

समाजा, तुझे संपले दैन्य आता
धुरा वाहती सूज्ञ पाटील की
नवा काळ येणार, व्हा शक्तिशाली
नवी चालवायास पाटीलकी

जये स्थापिले हिंदवी राष्ट्र शौर्य
महाराष्ट्रधर्मा जये प्रेरिले
जिजाबाइचा पुत्र तान्हा शिवाजी
तयाचे अम्ही सौंगडी मावळे

महाराष्ट्र त्याचा सुविख्यात, आहो
मराठे अम्ही राज्यकर्ते खरे
नव्या भाग्यकाळामधे भारताच्या
पुढे चालवू आपुले मोहरे

जिथे जन्म झाला शिवाजीप्रभूचा
शिवनेरिच्या त्या शिवारातला
कवि स्फूर्तिने गात राहे पवाडा
करूनी गळा मोकळा आपला!

फुटे तांबडे भारताच्या क्षितीजी
उठा, स्वागताची तयारी करा
अहो, खानदेशस्थ सन्मित्र माझे,
प्रणामांस माझ्या तुम्ही स्वीकरा!

## ३६ : त्रिपुरी पौर्णिमा

ये आज त्रिपुरि पौर्णिमा । वदन चंद्रमा । पूर्ण फुलवोनी
करि विलास भुवनी शरदऋतूची राणी

किति धवल पडे चांदणे । गोड हासणे । जसे रमणीचे
जे रातराणिचे कुंज फुलवि हृदयीचे

ही विश्वाची प्रणयिनी । सिंधु-दर्पणी । बघे न्याहळुनी
ही रूपसुंदरी स्वताच जाई भुलुनी

मम हृदयसिंधु उचमळे । होउनी खळे । भाव-लहरींचे
उमलतात कवने जणू कळे कमळांचे

पौर्णिमा करा साजरी । हर्षनिर्भरी । तुम्ही भावंडे
चांदणे चकोरापरी लुटा आनंदे

मी रुग्ण इथे आश्रमी । होउनी श्रमी । तळमळे शयनी
मन माझे तुमच्याकडेच गेले उडुनी

मज दिसतो रांगोळिचा । रम्य गालिचा । रेखिला कुशले
ती भावमधुर पाहुनी कला मन भुलले

तुम्हि गगनदीप बनविला । उंच चढविला । विलसतो गगनी
राहील चिरंतन तेवत अंतःकरणी

त्या पणत्या तुम्हि लाविल्या । स्मृती आपुल्या । कधि न विझणाऱ्या
या कळ्या जीवनातल्या सदा फुलणाऱ्या !

## ३७ : कागदी नावा

कागदी नावा करोनी एक एकामागुनी
वाहत्या पाण्यात देतो मी मजेने सोडुनी
नाव माझे, गाव माझे माझिया नावांवरी
मी लिहीतो शाइने काळया नि मोठ्या अक्षरी

वाहुनी जातील नावा दूर त्या बेटावरी
वाटते, वाचील माझे नाव की कोणीतरी
सोडितो नावा भरोनी शुभ्र जाईची फुले
जायची काळया प्रदेशा ही प्रकाशाची मुले

पाहता ही मौज जाते दृष्टि आकाशाकडे
चालती नावा ढगांच्या पांढरी ज्यांची शिडे
माझिया नावांसवे की लावण्याला शर्यत
कोण माझा सौंगडी तेथूनि नावा सोडित ?

झाकुनी बाहूत डोके सांजवेळी झोपतो
तारकागंगेत नावा पोहताना पाहतो
स्वप्नपुष्पांच्या भरोनी टोपल्या नावांतुनी
चालल्या मारीत वल्ही काय निद्रायक्षिणी ?

[ ' Paper-boats '—रवींद्रनाथ ठाकूर ]

## ३८ : ध्येयावर !

झिरून सिकताकणांपरिस जाति आयुःक्षण
हळहळु म्हणून हा डळमळे पहा हृत्तट
हुरूप नच राहिला, मतिहि जाहली अस्थिर
निरर्थक विचारितो निज मना, ‘ करू काय मी ? ’

हिमाद्रि–शिखराहुनी अधिक उंच मद्‌ध्येय, ती—
जिवा सतत ओढणी गगनिच्या पतंगापरी
जिणे अजुनि पायथ्यावरिच राहुनी कंठितो
वरी नजर टाकिता नयन जाति हे फाटुनी !

विशाल दिसती उभे किति पहाड माझ्यापुढे
चढून अवघी मला चढण थेट जाणे असे
प्रवासपथ पाहुनी बिकट, वृत्ति हो कुंठित
इथून मम जीव हा तळमळे समुत्कंठित !

उडून दिन चालले तरल या अवस्थेमधे
कसे न अजुनी पडे प्रगतिचे पुढे पाउल ?
वृथा बघत अंबरी निघुन आयु जाणार का ?
मनोरचित वैभवे विफल हाय ! होणार का ?

अशी अहह ! दुर्दशा बघु नकोस गे शारदे
तुझाच वसती करी नव ‘ निसर्ग ’ ध्येयावर
क्षणात मज पोचवी बसवुनी तुझ्या वाहनी
सवे सुभग घेत मी कवनदेहिनी नंदिनी !

प्रभाव मग तू पहा जननि, तेथ जाताक्षणी
वसंत फुलवील ती रुचिर दिव्य आलापिनी
बघून नव वैभवा मग हवेतल्या देवता
'अहो नवल!' बोलुनी तुकवितील माना निज

अदृश्य किमयांसवे उतरतील त्या खालती
सहर्ष कवितेत मी प्रगटवीन त्या अद्‌भुत
अनेक किमया सुधोपम मिळून गंगानदी
प्रसन्न, मधु गायिका सरस वाहु लागेल ती!

प्रवाह मग मी तिचा वरुनि खालती आणिन!
म्हणेल अवघे जगत्, 'अवतरे महाकाव्य हे!'
भगीरथ उभा असे जननि गे, परी प्रश्न हा
प्रवाह शिरि झेलुनी धरिल कोण गंगाधर?

चमत्कृति करीन मी सकल उच्च ध्येयावर
भुईवरति रंगुनी अधिक पांगळा होइन
त्वरा करुनि पोचवी मजसि शारदे, कारण
झिरून सिकताकणांपरिस जाति आयुःक्षण!

## ३९ : प्रतिभा

आकाशसृष्टि निमिषी नयनांत मावे
मी हो कशास तिजशी प्रतिभे तुलावे ?
पक्षी अथांग गगनी क्षण घे भरारी
आला न एकहि परी बघुनी तमारी

या भास्करात तळपे जरि भा स्वभावे
नामे यथार्थ परि ही प्रतिभा प्रभावे
त्या भास्करा मग कशास वृथा तुलावे ?
हीते बघून निज नेत्र दिपून जावे !

हा उंच उंच चमके गगनात तारा
कक्षेस सोडुनि फिरे न परी बिचारा
या पोकळीपलिकडे प्रतिभा प्रदेश
निर्मी नवे रुचिर, विश्व जसा परेश !

आता तुळू जरि शशी, क्षय त्यास आहे
ही पौर्णिमा–पदि सदैव विराजताहे
ही शीतला पसरली गगनात गंगा
हो म्लान, ये जड उषा उधळीत रंगा

हीते न वेध परि लागत कोणताही
आला न घालिल हिला कुणिही कधीही
केव्हातरी उगवतो नभि धूमकेतू
साश्चर्य दावित जनांस अभद्र हेतू

ठावा न अस्त हिजला, शुभदा सदा ही
हीते बघून कविचे मन फुल्ल होई
दिग्मंडळात करिते प्रतिभा प्रवेश
ही यत्र हृदी वसत, तोच खरा कवीश!

## ४० : जाईची फुले

हे नव्हे आकाश, भासे
यामिनीचा हा बगीचा
या नव्हे तारा, सडा हा
शुभ्र जाईच्या फुलांचा

आणि तो हौशी फुलांचा—
नी मुलांचा चंद्रराणा
नाकळे येऊन केव्हा
वेचुनी ने या फुलांना!

मात्र मी जेव्हा उठूनी
अंबरी पाहे पहाटे
एकही तारा दिसेना
अंतरी आश्चर्य वाटे

वेचलेली ती फुले का
चंद्रमा टाकून जाई!
आणि बागेतील माझ्या
ये बहारा शुभ्र जाई!

[ 'Daisies'—फ्रँक शेर्मन. ]

## ४१ : लिंबोळ्या

एकटा एकटा अगदी एकटा
अज्ञात बेटात अज्ञातवासात
दिवस कंठीत दिवस मोजीत
आहे मी दुर्भागी अगदी अभागी

घरदार दूर आईबाप दूर
मुलेबाळे दूर माय त्यांची दूर
इथे मी एकटा अगदी एकटा !

अशाच तंद्रीत अशाच भ्रांतीत
घरच्या स्मृतीत होऊनिया रत
बसलो होतो मी ' जीवन–आश्रमी '
एका सायंकाळी लिंबतरूखाली !

आकाशी मोठाले ढग काळे काळे
ढग वळवाचे मृग पावसाचे
अचानक आले खाली कोसळले
आले तसे गेले पुन्हा लख्ख झाले !
लिंब झाला चिंब भिजलो मी चिंब
जरी माझ्यावर होते त्याचे छत्र
कितीतरी वेळ मृगाचा हा खेळ
उभा मी पाहत परी शून्य चित्त !
मधून मधून अंग हालवून
जलबिंदूसर माझ्या शिरावर
सोडी ओघळून मजेत तो लिंब !

आणिक आपल्या पिकल्या लिंबोळ्या
टाकून दे खाली टपटप खाली
मजेत तो लिंब !

हातात घेतली एक मी लिंबोळी
वाटले चोखोनी चव तिची घ्यावी
कडवट गोड करावया तोंड !
परी न चाखिली टाकून ती दिली
माझा प्रौढपणा तसे करू दे ना
आणि माझे मन पंख पसरून
भूतकाळामध्ये बाळपणामध्ये
गेले ते उडून मजला घेऊन !

माझ्या वाडीतील छोटी ती पडळ
पुढे रुंद ओटा शेजारीच गोठा
विहीरीजवळ थोराड तो लिंब !
ज्येष्ठ सुरू झाला मृगपावसाचा
आणि पावशाचा 'पेर्तांऽहो पेर्तांऽहो'
टाहो फोडण्याचा
पिकल्या लिंबोळ्या खाली गळण्याचा !

भाऊ नी बहिणी मित्र नी मैत्रिणी
मिळुनी सगळे वेचल्या लिंबोळ्या
होते ते 'हापूस' किंवा 'राजहंस'
पिवळे धमक आंबे नामवंत
आणि पडवीत तृण पसरून
आम्ही त्या आंब्यांच्या लावियेल्या आढ्या

आंबराई होती पाडाला लागली
घरामधी होत्या आढ्या लागलेल्या
पण त्या आढ्यांची पाडाच्या आंब्यांची
शुद्धही नव्हती गोडीही नव्हती !
आम्ही आढीतल्या शेलक्या पिवळ्या
काढिल्या लिंबोळ्या भरल्या टोपल्या
आणि ओटीवर मांडिला बाजार
खरेदीविक्रीचा झाला व्यवहार
चिंचोक्यांचा गल्ला केला मग गोळा
रुपये आण्यांचा हिशोब तो साचा !
कमाई पाहून गेलो हरखून
मग सगळ्यांनी मिळून चाखिल्या
पिवळ्या लिंबोळ्या !
आणिक म्हणालो, ' काय आंबे गोड ! '

पुन्हा परतून आले माझे मन
आणि लिंबाखाली नव्हते ते आंबे
लिंबोळ्यांचा खच घ्यावया वेचून
पुन्हा तो संकोच !

मग मी बाळांना माझ्या सोनुल्यांना
मनच्या मनात घातलीसे साद
होती ती पुण्यात आपुल्या घरात
हासत खेळत नाचत डोलत !
' यारे इंदू, सिंधू शाम आणि नंदू
ये ग बाळ मंदा तान्हुल्या आनंदा ! '
माझ्या भोवताली नाचा थयथय !
मोठ्याने मोठ्याने आरडा ओरडा
येथला एकांत भयाण एकांत
पिटूनिया टाळ्या पिटाळून टाका !

घ्या रे वेचूनिया          येथल्या लिंबोळ्या
आंबे समजून          सारे खा चोखून
मिटक्या मारून          म्हणा, ' हे हपूस
किती गोड गोड ! '
हातात माझिया          देऊन लिंबोळ्या
करा ना एकदा          खाण्याचा आग्रह
होऊ द्या एकदा          मुलामध्ये मूल
तुम्हा छोट्यांमध्ये          एक मोठे मूल !

माझिया वंशाचे          माझिया रक्ताचे
माझिया बाल्याचे          माझिया भावांचे
तुम्ही आहा अंश !
तुमच्यात माझा          तुमचा माझ्यात
भरलेला आहे          माझ्या ममत्वाचा
काही एक अंश !
गेलेल्या बाल्याचा          गेलेल्या काळाचा
उगीच का शोक ?
गेलेच जे नाही          हरपले नाही
अशा त्या श्रेयाचा          उगीच का शोक ?
कल्पने, आवर          आपली पाखर
पुन्हा वास्तवात          चित्त आहे येत
अरेरे ! पुन्हा मी          उरलो एकटा
अगदी एकटा
एका सायंकाळी          लिंबतरूखाली !
डोळयांतूत माझ्या          गळून पडल्या
अश्रूंच्या लिंबोळ्या !
सहानुभूतीने          आणि त्या लिंबाने
वरून गाळिल्या          आपल्या लिंबोळ्या !

# ' अभंग-कूजन '

# देव

१ : प्रभो, मी करीन स्फूर्तीने कूजन !

ऊठ ऊठ जीवा, जाहली प्रभात
चंडोल नभात भरारी घे
वाऱ्याच्या झुळुका शीतळ मंजुळ
कशा झुळझुळ वाहती या !
किलबिल झाली पाखरांची सुरू
आनंदले तरु गायनाने
जीवनाची माझ्या उजडे पहाट
माझी मला वाट सापडली
प्रभो, मी करीन स्फूर्तीने ' कूजन '
मानूनी पूजन घेई माझे

## २ : गाऊ काय नये मीही प्रभो !

कुणी दुष्ट मला खुडील या भये
फुलू काय नये कलिकेने
सिंधु अवचित गिळील या भये
वाहू काय नये सरितेने
कुठारीचा घाव बसेल या भये
वाढू काय नये झुडुपाने
पारध्याचा शर विंधील या भये
उडू काय नये पाखराने
आज उद्या मृत्यु ग्रासील या भये
गाऊ काय नये मीही प्रभो !

## ३ : किती तू सुंदर असशील !

देवा, तुझे किती सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो
सुंदर चांदण्या, चंद्र हा सुंदर
चांदणे सुंदर पडे त्याचे
सुंदर ही झाडे, सुंदर पाखरे
किती गोड बरे गाणे गाती
सुंदर वेलींची सुंदर ही फुले
तशी आम्ही मुले देवा, तुझी
इतुके सुंदर जग तुझे जर
किती तू सुंदर असशील ?

## ४ : विराटस्वरूपा, ब्रम्हाण्डनायका--!

विराटस्वरूपा, ब्रह्माण्डनायका,
गातो मी आयका भव्य स्तोत्र
भर्जरी सागरी, आभाळी, शाद्वली
नेसवी माउली वस्त्रे तुम्हा
आकाश–तबकी चंद्रसूर्यज्योती
करिती आरती अष्टदिशा
स्वर्गङ्गा तुमचे चरण प्रक्षाळी
वाहते ओंजळी तारकांच्या
ग्रहमाला गाई धरूनिया फेर
ढाळितो चामर मरुद्गण

## ५ : कोण तू--?

ग्रह–भोवऱ्यांचा खेळ अधान्तरी
कोण तू गारोडी खेळणारा ?
हंड्याझुंबरांचे अंबराला छत
कोण तू श्रीमंत लावणारा ?
सुगंधी शीतळ वाऱ्याचे विंझण
विलासी तू कोण सोडणारा ?
दिव्य रंगाकृति व्योमपटावरी
कोण तू चितारी काढणारा ?
विश्वाची ही बाग सदा फुललेली
कोण तू गा माळी ठेवणारा ?

## ६ : लाडावले पोर--!

लाडावले पोर पुरविता कोड
जन्माची ही खोड त्याला दिली
पुरे आता झाले माझे हे कौतुक
योग्यता ठाऊक माझी मला
दिल्या घेतल्याचा धनी कोणी नाही
देवा, सर्व काही लाड तुझे
मळकट तोंड बाळाचे पाहूनी
पुसीते जननी पदराने
मायेच्या हाताने देवा, माझा डाग
लगोलग टाक पुसूनीया

## ७ : हवा देवराय, धाक तुझा !

लाख गुन्हे माझे झाले आजवरी
आता लाज वरी मन माझे
तोच तोच गुन्हा करी मी कोडगा
म्हणतो, ‘ कोड गा पुरव तू ! ’
क्षमाशील मला क्षमा करशील
सावराया शील पुन्हा माझे
क्षणाचा परतावा कामाचा तो काय !
हवा देवराय, धाक तुझा
कठोर शासन एकदाच करी
तेच हितकरी परिणामी

## ८ : उजळेल माझे जीवन–सुवर्ण !

मोठेपणाचे ते केले होते ढोंग
केवळ ते सोंग वरपांगी
मुलाम्याचे नाणे होते खोटेनाटे
चाले ना ते कोठे बाजारात
बरे झाले देवा, घसरलो खाली
ओळख पटली खरीखुरी
तुझ्या पायापाशी बसुनी मी देवा,
आचरीन सेवा मनोभावे
उजळेल माझे जीवन–सुवर्ण
जाईल झडून हीण सारे

## ९ : घरातच माझ्या उभी होती सुखे !

घरातच माझ्यां उभी होती सुखे
नच देखू शके आंधळा मी
मृगजळामागे दूर दूर गेलो
परतून आलो तान्हेला मी
समाधान नाही, सदा वखवख
सदा रुखरुख मनामाजी
मोलवान ठेवा सोडुनी घरचा
भिकारी दारचा जाहलो मी
असा देवा, झालो भ्रष्ट वेडापिसा
शुद्धीवर कसा आणशील ?

## ६ : लाडावले पोर--!

लाडावले पोर पुरविता कोड
जन्माची ही खोड त्याला दिली
पुरे आता झाले माझे हे कौतुक
योग्यता ठाऊक माझी मला
दिल्या घेतल्याचा धनी कोणी नाही
देवा, सर्व काही लाड तुझे
मळकट तोंड बाळाचे पाहूनी
पुसीते जननी पदराने
मायेच्या हाताने देवा, माझा डाग
लगोलग टाक पुसूनीया

## ७ : हवा देवराय, धाक तुझा !

लाख गुन्हे माझे झाले आजवरी
आता लाज वरी मन माझे
तोच तोच गुन्हा करी मी कोडगा
म्हणतो, ' कोड गा पुरव तू ! '
क्षमाशील मला क्षमा करशील
सावराया शील पुन्हा माझे
क्षणाचा परतावा कामाचा तो काय !
हवा देवराय, धाक तुझा
कठोर शासन एकदाच करी
तेच हितकरी परिणामी

## ८ : उजळेल माझे जीवन-सुवर्ण !

मोठेपणाचे ते केले होते ढोंग
केवळ ते सोंग वरपांगी
मुलाम्याचे नाणे होते खोटेनाटे
चाले ना ते कोठे बाजारात
बरे झाले देवा, घसरलो खाली
ओळख पटली खरीखुरी
तुझ्या पायापाशी बसुनी मी देवा,
आचरीन सेवा मनोभावे
उजळेल माझे जीवन-सुवर्ण
जाईल झडून हीण सारे

## ९ : घरातच माझ्या उभी होती सुखे !

घरातच माझ्यां उभी होती सुखे
नच देखू शके आंधळा मी
मृगजळामागे दूर दूर गेलो
परतून आलो तान्हेला मी
समाधान नाही, सदा वखवख
सदा रुखरुख मनामाजी
मोलवान ठेवा सोडुनी घरचा
भिकारी दारचा जाहलो मी
असा देवा, झालो भ्रष्ट वेडापिसा
शुद्धीवर कसा आणशील ?

## १० : तुझी का रे घाई माझ्यामागे ?

परतीरी उभा राहूनी तू हाका
एकसारखा का मारितोस ?
अडथळा होतो मला सदाकदा
लक्ष माझे द्विधा करितोस
अद्यापहि माझे काम झाले नाही
तुझी का रे घाई माझ्यामागे ?
कामकाज माझे पूर्ण झाल्यावर
नाही क्षणभर थांबणार !
थांब थोडा वेळ, करितो विनंती
तुला काकूळती येऊनि मी !

## ११ : तुझ्या गावचा मी इमानी पाटील !

साऱ्या मंडळींना माझा रामराम
चावडीचे काम सुरू करू
आपुली रकम देऊनीया टाका
थकबाकी नका ठेवू कुणी
कुळकर्णी, काढा हिशेबाच्या वह्या
जमाखर्च लिहा बिनचूक
वेसकरा, भरी कचेरीत पट्टी
घेऊनि पावती परत ये
तुझ्या गावचा मी इमानी पाटील
देवा, त्या कोठील भीडभाड !

## १२ : देव आसपास आहे तुझ्या !

पुढे पुढे आता असेच जायाचे
मागे न यायाचे परतुनी
चुटकीसरशी आणि एक दिन
व्हायाचे विलीन अनंतात !
मागे वळूनीया पाउलांच्या खुणा
का रे पुन्हा पुन्हा पाहातोस ?
का रे दचकुनी लागता चाहूल
पुढले पाऊल टाकितोस ?
अरे माझ्या जीवा, ठेव हा विश्वास
देव आसपास आहे तुझ्या !

## १३ : देवा, माझे पाप नको मानू हीन !

कमळाला जन्म देणाऱ्या चिखला,
कस्तूरि तुजला मानितो मी
जन्म घे कोळशा, हिरा तुझ्या पोटीं
तुझे गुण कोटी पारखी मी
कोण म्हणे दासी, देवी तू पवित्र
उदरी विदुर जन्मे तुझ्या
कान्होपात्रे अगे, गणिकेच्या मुली,
तुझी मी माउली वन्द्य मानी
देवा, माझे पाप नको मानू हीन
फुलव त्यातून गुणवल्ली

## १० : तुझी का रे घाई माझ्यामागे ?

परतीरी उभा राहूनी तू हाका
एकसारखा का मारितोस ?
अडथळा होतो मला सदाकदा
लक्ष माझे द्विधा करितोस
अद्यापहि माझे काम झाले नाही
तुझी का रे घाई माझ्यामागे ?
कामकाज माझे पूर्ण झाल्यावर
नाही क्षणभर थांबणार !
थांब थोडा वेळ, करितो विनंती
तुला काकूळती येऊनि मी !

## ११ : तुझ्या गावचा मी इमानी पाटील !

साऱ्या मंडळींना माझा रामराम
चावडीचे काम सुरू करू
आपुली रकम देऊनीया टाका
थकबाकी नका ठेवू कुणी
कुळकर्णी, काढा हिशेबाच्या वह्या
जमाखर्च लिहा बिनचूक
वेसकरा, भरी कचेरीत पट्टी
घेऊनि पावती परत ये
तुझ्या गावचा मी इमानी पाटील
देवा, त्या कोठील भीडभाड !

## १२ : देव आसपास आहे तुझ्या !

पुढे पुढे आता असेच जायाचे
मागे न यायाचे परतुनी
चुटकीसरशी आणि एक दिन
व्हायाचे विलीन अनंतात !
मागे वळूनीया पाउलांच्या खुणा
का रे पुन्हा पुन्हा पाहातोस ?
का रे दचकुनी लागता चाहूल
पुढले पाऊल टाकितोस ?
अरे माझ्या जीवा, ठेव हा विश्वास
देव आसपास आहे तुझ्या !

## १३ : देवा, माझे पाप नको मानू हीन !

कमळाला जन्म देणाऱ्या चिखला,
कस्तूरि तुजला मानितो मी
जन्म घे कोळशा, हिरा तुझ्या पोटीं
तुझे गुण कोटी पारखी मी
कोण म्हणे दासी, देवी तू पवित्र
उदरी विदुर जन्मे तुझ्या
कान्होपात्रे अगे, गणिकेच्या मुली,
तुझी मी माउली वन्द्य मानी
देवा, माझे पाप नको मानू हीन
फुलव त्यातून गुणवल्ली

## १४ : सर्व हे नश्वर, शाश्वत ईश्वर !

जायाचे जग हे असेच यापुढे
उगाच बापुडे मन कुढे
यायची जायची तीच तीच दुःखे
तीच तीच सुखे पुन्हा पुन्हा
तीच ती वादळे, तेच ते भूकंप
तेच ते प्रकोप प्रळयाचे
तीच तीच युद्धे, तीच तीच क्रांति
केवळ आवृत्ति मागल्याची
सर्व हे नश्वर, शाश्वत ईश्वर
तोच मना स्मर निरंतर

## १५ : अपूर्णच ग्रंथ माझा राहो !

पौर्णिमेच्या चंद्रा, पुरे हा उत्सव
आता तुला क्षय लागणार
फुललेल्या फुला, हौस पुरे झाली
गळशील खाली कोमेजुनी
डोंगर चढूनी आलास तू थेट
आता कडेलोट ठरलेला !
उगाच आणखी जीवनाचा फुगा
फुगविशी फुका, फुटेल ना !
पूर्ण व्हायचे न मला भगवन्त,
अपूर्णच ग्रंथ माझा राहो !

## १६ : कळो वा न कळो तुझे ते गुपित !

पाखरे करिती गोड कुजबुज
काय हितगुज चाले त्यांचे !
भ्रमर फुलांशी करितो गुंजन
कोणते कूजन चाले त्याचे
वारा घुमघुमे वनराईमाजी
काय चाले त्याची कानगोष्ट !
लेकराच्या कानी कुजबुजे माय
त्याचा अर्थ काय तीच जाणे
कळो वा न कळो तुझे ते गुपित
सांग तू कानात देवा, माझ्या

## १७ : देवा, तूच माझा खरा धन्वन्तरी !

नका करू मला कोणी उपदेश
आदेश–संदेश देऊ नका
नका सांगू कोणी वेदान्ताच्या गोष्टी
जीव माझा कष्टी करू नका
जीवनाचे जुने शिळे तत्त्वज्ञान
किटले हे कान ऐकूनीया
काय औषधाचा झाला उपयोग
नाहीं बरा रोग होत त्याने
देवा, तूच माझा खरा धन्वन्तरी
प्रकृतीचे करी निदान तू !

## १८ : होऊ दे एकदा पुरा अधःपात !

अजून लागाया हवी खरी ठेच
हवा खरा पेच पडावया
अजून पुरे न उघडले डोळे
दिसाया, ' वाटोळे झाले माझे ! '
बुडल्याचा पाय चालला खोलात
तरी मी भ्रमात आहे माझ्या
नाही मला झाला खरा अनुताप
मागील ते व्याप पुन्हा सुरू
होऊ दे एकदा पुरा अधःपात
नंतर तू हात देई, देवा

## १९ : वाळवंटी आहे बाळ मी खेळत !

वाळवंटी आहे बाळ मी खेळत
गंमत पाहात आहेस तू
चिमणीचे कोटे आहे मी बांधीत
मोडीत जोडीत पुन्हा पुन्हा
शंख आणि शिंपा आहे मी वेचीत
रेघोट्या ओढीत रेतीवर
भरती ओहोटी आहे मी पाहत
टाळ्या मी पिटीत हर्षभरे
थोडा वेळ माझा खेळ हा पाहून
मजला घेऊन जाणार का ?

## २० : चिमुकले बाळ आहे मी अल्लड !

चिमुकला तारा करी लुकलुक
तयाचे कौतुक रात्र करी
चिमुकले फूल वेलीवरी डुले
वनदेवी भुले पाहून ते
चिमुकला झरा वाहे खेळकर
नदी कडेवर त्याला घेई
चिमुकले फूलपाखरू गोजिरे
करी ते साजिरे उपवन
चिमुकले बाळ आहे मी अल्लड
देव माझे लाड पुरवीतो

## २१ : सुरेल वाजीव बन्सी पुन्हा !

अगा गोकुळाच्या बहिश्चर प्राणा,
अवतार कृष्णा, घेई पुन्हा
नंदयशोदेच्या कन्हय्या केशवा,
घेऊन शैशवा येई पुन्हा
हास्यविनोदाचे फुलव राजीव
सुरेल वाजीव बन्सी पुन्हा
गुंजमाळा गळा, शिरी मोरपिसे
लाव आम्हा पिसे तुझे पुन्हा
झाला हा भारत दारिद्र्ये व्याकुळ
समृद्ध गोकुळ आण पुन्हा

## २२ : आहेतच तुझे स्कंधी माझ्या हात !

आहेतच तुझे स्कंधी माझ्या हात
कोण माझा घात करणार ?
प्रसंग मोठाले आले आणि गेले
निभावून नेले तूच मला
जे जे मी वांछिले ते तू मला दिले
नाही पडू दिले कमी काही
घडले हातून कैक अपराध
परी पदरात घातले तू
तरी माझी आहे चालली हाकाटी
असा जगजेठी, करंटा मी !

## २३ : केव्हाची मी तुझी पाहताहे वाट

केव्हाची मी तुझी पाहताहे वाट
परी पदरात निराशाच !
केव्हाच माध्यान्ह टळूनीया गेली
पसरू लागली संध्या छाया
पुढती गेलेल्या कारवानांचिया
लागल्या यावया हाका कानी
तरी रेंगाळत चाललो मी आहे
तुला शोधिताहे आसपास
नाही सोसवत आता ओढाताण
होऊ लागे प्राण कासावीस

## २४ : प्रभो, तुझ्या एका मंगल नामात--

एका सूक्ष्म बीजावरी गेले लक्ष
त्यात महावृक्ष दिसे मला
बालनिर्झराच्या उगमात मला
आढळून आला महानद
बोल निघे बालकवीच्या तोंडून
ऐकिले त्यातून महाकाव्य
एका अणुमाजी शास्त्रज्ञ पाहती
कोटिविश्वशक्ती भरलेली
प्रभो, तुझ्या एका मंगल नामात
स्वरूप विराट सामावलें

## २५ : कोण मला त्राता तुझ्यावीण ?

पतंगासारखे मन धावे स्वैर
त्याचा सूत्रधार तूच देवा,
मोहाच्या धुक्यात चुकतो मी मार्ग
तेव्हा पांडुरंग, वाटाड्या तू
भवडोही माझी झुकताच होडी
चतुर नावाडी तूच होशी
संकटाचे येता धावून श्वापद
करिशी पारध तूच त्याची
अशी देवा, माझी वाहशी तू चिंता
कोण मला त्राता तुझ्यावीण ?

## २६ : कृतज्ञ होऊन मान समाधान !

का रे करितोस आता कुरकुर
लागे हुरहुर कशाची रे ?
अनुकूल सुखे तुला एकंदर
तुझे शिकंदर नशीब रे
उगाच आणखी मागसी मागणे
धरिसी धरणे देवाद्वारी
काय कमी केले तुला देवाजीने
देशी का दूषणे सदाकदा ?
कृतज्ञ होऊन मान समाधान
तुला जे निधान दिले त्यात !

## २७ : वल्हव वल्हव प्रभो, माझी होडी !

छेड छेड माझी प्रभो, ही सतार
निघू दे झंकार गोड गोड
फुलव फुलव माझे हे प्रसून
कराया पूजन देवा तुझे
पाजळ पाजळ माझी फुलवात
ठेव ती तेवत गाभाऱ्यात
स्फुरव स्फुरव माझे भावगीत
होवो ते अर्पित तुझे पायी
वल्हव वल्हव प्रभो, माझी होडी
नेई पैलथडी तुझ्या गावा

## २८ : यापुढे मी नाही गाणार गाऱ्हाणे

यापुढे मी नाही गाणार गाऱ्हाणे
देणार दूषणे तुला नाही
बोलणार नाही तुजला नवस
व्यर्थ हे सायास करीत मी
संकटा भिऊनी नाही मी यापुढे
तुजला साकडे घालणार
असंख्य पातके केली देवराया,
नाही निस्तराया सांगणार
आधी सुधारीन माझी वागणूक
प्रेरणाच एक हवी तुझी !

## २९ : आता भीत भीत तुला मी बाहत !

आताशी मजला सय तुझी झाली
होती जी बुझली आजवेरी
सम्राट होतो मी आपुल्या राज्याचा
भिकारी दारचा झालो आता
ठेंगणे मजला तेव्हा अंतराळ
चंडोल घायाळ खाली आलो
धुंदीचे सोडून धुके भवताल
आत मी खुशाल गर्क होतो
आता भीत भीत तुला मी बाहत
साशंक पाहत आसपास

## ३० : बाळ तुझे गेले भेदरून भारी !

तुवा अचानक सोडून वादळ
किती रे गोंधळ माजवीला !

पाहायाची होती मौज वा कसोटी !
काय हेतु पोटी होता तुझ्या ?

वावटळीमध्ये सापडावे पीस
तसा कासावीस झालो तेव्हा

बागुलाचें भय आई दाखवीते
पोटाशी धरिते लागलीच

बाळ तुझे गेले भेदरून भारी
आंजारी गोंजारी प्रभो, तया

# महात्मा

## ३१ : वसुंधरेवर खरा तू मानव !

तपश्चर्या तुझी चालली कधीची
अगा हे दधीचि ऋषिश्रेष्ठा,
वसुंधरेवर खरा तू मानव
जिंकिले दानव अहिंसेने
करोत प्रळय स्फोटक असंख्य
तुझे गा अजिंक्य आत्मबळ
स्थापाया शांतीचे अहिंसाप्रेरक
दलितोद्धारक लोकराज्य
आपुल्या अस्थींचे निर्मूनीया वज्र
पारतंत्र्य-वृत्र संहारिला !

## ३२ : भयाण काळोखी एक कृश मूर्ति !

भयाण काळोखी एक कृश मूर्ति
घेऊनि पणती हिंडताहे
सापडलेले होते भूमीवरी रक्त
करीत पुनीत पादस्पर्शे
जागोजाग होती लागलेली आग
म्हणे, ' फुलबाग फुलवीन '
पशु होते तिथे घालीत तांडव
' करीन मानव त्यांना ', म्हणे
शुक्रतारा कोणी किंवा देवदूत
पूर्वेला उदित झाला आहे !

## ३३ : पाउलापुरता नाही हा प्रकाश

सांगायाचे होते सांगून टाकले
जावो ते ऐकले वा न जावो
कधीचा घेऊन दीप अंधारात
आहे मी चालत पुढे पुढे
येणारे येतील शोधीत ही वाट
आहे मी एकटा नाहीतरी
पाउलापुरता नाही हा प्रकाश
दूरचे भविष्य माझ्यापुढे
म्हणोत कोणी हे अरण्यरुदन
माझे समाधान चिरंतन !

## ३४ : अजून उराशी धरिली मी आस

अजून उराशी धरिली मी आस
मजला प्रकाश दिसणार
काळोखच आहे मागेपुढे दाट
त्यातूनही वाट काढणार
पदोपदी काटे, पदोपदी ठेच
प्रभु गोमटेच करणार
दुःखाचेच घोट प्यालो आजवरी
सुख कधीतरी लाभणार
चाललाच आहे माझा नित्य शोध
होईल तो बोध होवो केव्हा

## ३५ : उत्तम मानव वसुंधरेचा हा

मानवधर्मांची पाजळून ज्योत
ईशाचा प्रेषित गेला स्वर्गा
अहिंसाशांतीचा सत्याग्रही वीर
त्यजूनी शरीर गेला स्वर्गा
दिव्य वज्रे जगा अर्पूनि अस्थींची
महात्मा दधीचि गेला स्वर्गा
उत्तम मानव वसुंधरेचा हा
त्यजुनीया देहा गेला स्वर्गा
हिंदजननीचा थोर हा सुपुत्र
गात ‘ राम–मंत्र ’ गेला स्वर्गा

## ३६ : युगायुगाचा तो जाहला महात्मा !

मारेकऱ्या, गेला व्यर्थ तुझा वार
नाही पारावर फजीतीला
अमर तो जाशी ज्याला मारायाला
मेल्याहूनी मेला झालास तू
काळे तुझे तोंड लोपे काळोखात
त्याला प्रकाशात जागा नाही
ज्यावरी येशूला केली खिळेठोक
धर्माचे प्रतीक झाला क्रूस
युगायुगाचा तो जाहला महात्मा
धनी तू दुरात्मा रौरवाचा

## ३७ : हरे राम ! किती पाहिला मी अंत !

" पिस्तुलाने मला दिला हा इशारा
विश्रांति शरीरा, हवी तुला
दरिद्री दलित झाला मायदेश
दिले तुला क्लेश त्याचेसाठी
सत्याग्रहास्तव तुला बंदिवास
सोशीले उपास निर्वाणीचे
मायबहिणींची पुसाया आसवे
तुला हिंडवीले आगीतून
हरे राम ! किती पाहिला मी अंत !
जा रे पंचत्वात विलीन हो "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 63880 दि: 08/08/21
क्रमांक 9885 नों: दि: 8/3/07
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93880

# स्वातंत्र्य

## ३८ : स्वातंत्र्य म्हणजे ईश्वराचे दान !

अरे हिंदपुत्रा, सांग कशासाठी
तुझी ही हाकाटी रात्रंदिस ?
कोणता तू केला आजवरी त्याग
जीवनाचा याग मातेसाठी ?
तुझा हा कलह, क्षुद्र तुझा मोह
तुझा मातृद्रोह ख्यात जगी
काय ही पायीच्या तोडतील बेड्या ?
कल्पना ही वेड्या सोड खुळी
स्वातंत्र्य म्हणजे ईश्वराचे दान
याचकाची दीन भिक्षा नोहे

## ३९ : फार मोठी आम्हा लागलीसे भूक !

फार मोठी आम्हा लागलीसे भूक
आता नाही मूक राहणार !
यापुढे आमचा रोज क्रांतिदिन
नाही हीनदीन राहणार
पेटविली आम्ही एकदा मशाल
आता सर्वकाल पेटणार
प्रचंड आमचा सुरू झाला यज्ञ
त्याला कोण विघ्न आणणार ?
चाळीस कोटींचे घोर आक्रंदन
कोण समाधान करणार ?

## ४० : आक्रोश, किंकाळ्या ऐकल्या मी !

मंगल मंगल उजळे प्रभात
कुजबुजे वात कानी माझ्या
उगवत्या सूर्या कराया वंदन
फिरवी वदन पूर्वेला मी
काय मी पाहिले ? काय मी ऐकिले ?
मस्तक जाहले सुन्न माझे
नव्हता तो रम्य अरुणाचा राग
होती आग आग पेटलेली
नव्हत्या प्रेमळ प्रसन्न भूपाळ्या
आक्रोश, किंकाळ्या ऐकल्या मी !

## ४१ : आता हवे बंड करावया !

केवळ आमुची केली समजूत
चांद आरशात दाखवीला
पुरा वीट आला, नको ती याचना
केवळ वंचना—मृगजळ
पुरे झाल्या थापा, होते ते थोतांड
आता हवे बंड करावया
माघारी आणाया हरपले श्रेय
आता हवे दिव्य करावया
उचलीला विडा, लाविला भंडार
आता हा निर्धार शेवटला !

## ४२ : कोटिकोटि आम्ही उभे अंधारात

नाही का आमुचे संपले ग्रहण ?
कधी मोक्षक्षण यावयाचा
क्षितिजी लागले कधीचे नयन
कुठे तो अरुण ? कुठे उषा ?
येणार येणार म्हणती उदया
कधी सूर्यराया येणार तो ?
तेजस्वी तयाच्या प्रकाशाचे कडे
कधी पूर्वेकडे दिसणार ?
कोटि कोटि आम्ही उभे अंधारात
कधी काळरात जाणार ही ?

## ४३ : परदेशाहून प्रगट हो चंद्रा !

परदेशाहून प्रगट हो चंद्रा
तुझी हास्यमुद्रा दिसो आम्हा
अवचित मागे जाहलास गुप्त
करूनी स्तिमित सर्व जगा
अतिपूर्वेकडे तुझा हो उदय
पावली विस्मय पश्चिमा ही
स्वदेशाचे मुख कराया उज्ज्वळ
तारक-मंडळ निर्मिले तू
औषधिपते, दे दिव्य संजीवनी
करी रे जननी व्याधिमुक्त

## ४४ : अरे कुलांगारा, करंट्या कारट्या !

अरे कुलांगारा, करंट्या कारट्या,
घातक कुलटा बुद्धि तुझी
जन्म दिला, केले लालन पालन
संस्कृति-शिक्षण दिले तुला
राहिली न तुला आईची ओळख
तुझे पापमुख पाहू नये
भोगिली अपार तिने कष्टदशा
आता तिच्या नाशा टपलास !
खांडोळी कराया उगारिशी हात
अरे तुझा घात ठरलेला !

## ४५ : आपुलेच आहे आता कुरुक्षेत्र !

एकदा तू मागे फुंकिलास शंख
फुंक तू निःशंक अनेकदा
प्रक्षोभक ध्वनि ऐकोत श्रवण
येऊ दे स्फुरण रोमरोमी
मोहनिद्रेतून झालास तू मुक्त
आता देवदत्त फुंक पुन्हा
आचराया हवा तोच कर्मयोग
पारतंत्र्य–रोग हरावया
आपुलेच आहे आता कुरुक्षेत्र
आहे ' भगवंत ' पाठीराखा !

## ४६ : तोच का आज ये सोन्याचा दिवस ?

आज नवी काही येत अनुभूति
नवी येत स्फूर्ति गीत गाया
नवीन युगाची नवीन पहाट
आज नवी वाट दिसू लागे
आज झाल्या बेड्या पायीच्या या खुल्या
चित्तवृत्ति खुल्या झाल्या माझ्या
अवनम्र शिर झालें हे उन्नत
नवीन हिंमत आज वाटे
तोच का आज ये सोन्याचा दिवस ?
नकळे हा भास किंवा सत्य !

# महायुद्ध

## ४७ : जगातले समर्थ !

न कळे काय हे शांततेचा अर्थ
लाविती ' समर्थ ' जगातले ?
विश्वबंधुत्वाची करिती घोषणा
न कळे कल्पना काय त्यांची !
दुबळ्यांच्या माथा ठेवूनीया हस्त
म्हणती हे, ' स्वस्थ बसा आता ! '
पिंजऱ्याचे दार करूनीया बंद
म्हणती हे, ' नांदा सौख्यभरे ! '
बोलती, ' जगाचे कराया रक्षण
लढतो भीषण महायुद्ध ! '

## ४८ : नांदू द्या तुमची साम्राज्ये सुखात !

समर्थांनो, असो तुमची शाबास !
तुमच्या शौर्यास जोड नाही
विजय-दिनाचा सोहळा साजरा
सावकाश करा आता तुम्ही !
नांदू द्या तुमची साम्राज्ये सुखात
भकास, उद्‌ध्वस्त जगात या
जिंकिली भूमि ती केवळ स्मशान !
फुलवा खुशाल बागा तिथे
आणि द्या एकदा काळाला आव्हान,
'आम्ही चिरंतन राज्य करू !'

## ४९ : दोस्त हो, तुमची गोड भारी वाचा !

"आता थांबवीले आम्ही हत्याकाण्ड
उन्मत्तांचे बंड शमवीले
दुबळ्या राष्ट्रांच्या वाराया आपदा
आम्ही परिषदा भरवीतो
शस्त्रास्त्रावरती घालुनी निर्बंध
करू प्रतिबंध अत्याचारा
समताशांतीची निर्मू लोकराज्ये
करू अविभाज्ये पृथ्वी स्वर्ग !"
दोस्त हो, तुमची गोड भारी वाचा
रिकाम्या भांड्याचा नाद जैसा !

## काळ

### ५० : हे फिरस्त्या काळा—!

सोडून काळा, ही सराई फिरस्त्या
धरशील रस्ता कोणता तू ?
काल बाबिलोनी ठेविला मुक्काम
नंतर तू रोम गाठिलेस
आज मंदिरात साधु पॉलाचिया
विसावा घ्यावया थांबलास
एक तुझा पाय दिसे रिकिबीत
झाली इतक्यात हालचाल
जन्म झाला नाही अशा त्या स्थळास
जावया झालास उतावीळ

## ५१ : नका वाहू व्यर्थ संस्कृतीचा गर्व !

विकट हासूनी काळ ओरडला,
" खुळयांनो, तुम्हांला भान नाही
हजारो हजार वर्षांपाठीमागे
तुम्हा जावे लागे खुणेसाठी
कोण होता तुम्ही ? पटली ओळख ?
आता का रे मुख चुकविता ?
हजारो हजार वर्षें लोटतील
प्राप्त ती होईल गती पुन्हा
नका वाहू व्यर्थ संस्कृतीचा गर्व
हारवीन सर्व क्षणमात्रे ! "

## ५२ : असा तू प्रवासी विक्षिप्त रे !

मुख मागे पण पुढे तू चालशी
रीत तुझी अशी उफराटी
सरळ का तुझे पडते पाऊल !
तुझी वाटचाल नाही सुधी
तुझी कुरकूर पाउलागणिक
नेहमी साशंक मुद्रा तुझी
मागीलांसंबंधी प्रशंसा अक्षयी
पुढीलांविषयी पूर्वग्रह
पुढे पुढे तरी चालत असशी
असा तू प्रवासी विक्षिप्त रे !

## ५३ : रामराज्य मागे कधी झाले नाही !

रामराज्य मागे कधी झाले नाही
होणार पुढेही नाही कधी
केवळ ते होते गोड मनोराज्य
कल्पनेचे काव्य वाल्मीकिचे
कधीच नव्हती रावणाची लंका
अपकीर्ति-डंका व्यर्थ त्याचा !
दोन्ही अधिराज्ये होती मानवांची
नव्हती देवांची-दानवांची
भाविकांनो, झाली होती दिशाभूल
सोडूनी द्या खूळ आता तरी !

# मानव

## ५४ : आई मानवते—!

आई मानवते, आता तुझी काही
बघवत नाही विटंबना
आक्रोश तुझा गे ऐकवत नाही
बघवत नाही अश्रु तुझे
उन्मत्त जाहले शंभर कौरव
जाहले पांडव हतबुद्ध
द्रौपदीस छळी दुष्ट दुःशासन
मिळे त्या शासन प्राणांतिक
कोण कृष्ण तुझी राखावया लाज
अवतार आज घेणार गे !

## ५५ : मानवाचा आला पहिला नंबर !

पशूंचे एकदा भरे सम्मेलन
होते आमंत्रण मानवाला
" दुबळा, भेकड, क्षुद्र कोणी प्राणी ! "
करी हेटाळणी जो तो त्याची
" ऐका हो, " बोलला अध्यक्ष केसरि
" जाहीर मी करी बक्षीस हे
क्रूर हिंसा–कर्मी उच्चाङ्क गाठील
पात्र तो होईल बक्षिसाला "
मानवाचा आला पहिला नंबर
लाजले इतर पशु हिंस्र !

## ५६ : जातीवर गेला मानव आपुल्या !

अणुस्फोटकाचा नका मानू रोष
सारा आहे दोष मानवाचा
मानव म्हणजे एक पशुवंश
मुख्य तो विध्वंस–कर्म जाणे
अणुरेणूमध्ये वसे परब्रह्म
गेला वेदधर्म विसरुनी
मर्कटाच्या हाती दिधले कोलीत
सुटले लावीत आग जगा
जातीवर गेला मानव आपुल्या
व्हायचा होऊ द्या नाश आता !

## ५७ : अभागिनी आई, पुरा झाला घात !

का गे रडतेस आता धायधाय !
आणि हाय हाय म्हणतेस !
शेफारले पोर तुझे खोडकर
झाले अनावर आता तुला
नको म्हणताही कोठाराची किल्ली
त्याचे हाती दिली भोळेपणे
गुप्त तिथे होती संदूक ठेविली
अखेर लागली त्याचे हाती
अभागिनी आई, पुरा झाला घात
तुझ्या नशिबात दुःख आता !

## ५८ : आरंभ उद्यान, शेवट स्मशान –

आरंभ उद्यान, शेवट स्मशान—
आमुचे जीवन असे आहे !
सुंदर, आनंदी निसर्ग स्वतंत्र
त्याला आम्ही यंत्र केले आहे
एकाच आईची बाळे आम्ही सारी
परी हाडवैरी झालो आहो
जे जे अकृत्रिम, करावे कृत्रिम—
आमुचे अंतिम ध्येय आहे
आदमईव्हाच्या वारसाकडून
अपेक्षा याहून दुजी काय !

## ५९ : आता भोवतात तुमचे ते शाप !

मीच गुन्हेगार आहे दलितांनो,
अहो मजुरांनो, कुणब्यांनो
मीच तुम्हा नित्य उपाशी ठेविले
आणि निजवीले धुळीमध्ये
मीच माझ्यासाठी तुम्हा राबवीले
तुम्हा नागवीले सर्वस्वी मी
तुमचे संसार उद्‌ध्वस्त मी केले
तुम्हांला लावीले देशोधडी
आता भोवतात तुमचे ते शाप
असे घोर पाप माझे आहे !

# संस्कृती

## ६० : यंत्रयुगात या आमुचे जीवित—!

यंत्रयुगात या आमुचे जीवित
कळसूत्री यंत्र झाले आहे
सृष्टीचे सुंदर पाहाया स्वरूप
राहिला हुरूप आम्हा नाही
रम्य अस्तोदय, इंद्रचाप-शोभा
पाहावया उभा आम्ही नाही
पाखरांची गाणी, निर्झराची शीळ
ऐकावया वेळ आम्हा नाही
निसर्गाशी गोष्टी बोलाया निवांत
क्षणाची उसंत आम्हा नाही

## ६१ : अपूर्वच यंत्रा, तुझी जादुगिरी !

अपूर्वच यंत्रा, तुझी जादुगिरी
तुझी कारागिरी काय वानू !
हवेत पांगल्या गायनलहरी
घेतोस अंतरी आकळूनी
कळ फिरविता पुन्हा ऐकवीसी
संतुष्ट करिसी चित्त माझे
मानव-मतीचा अद्‌भुत विलास
विश्व आसपास बोले, भासे
निगूढ संगीत गाती ग्रहगोल
येईल का बोल ऐकू मला ?

## ६२ ! असे आम्ही झालो आमुचे गुलाम !

इथे गवतात उमलले फूल
परी कोणा भूल पडे त्याची !
इथे झुडपात खग गाई गान
कोण ऐके कान देऊनीया !
इथे डोंगरात थुईथुई ओढा —
वाहे, त्याची क्रीडा कोण पाहे !
इथे माळावर सुटते झुळूक
कोण तिचे सुख अनुभवी !
असे आम्ही झालो आमुचे गुलाम
राहिला न राम जीवनी या !

## ६३ : मार्ग हा निघाला अनंतामधून

मार्ग हा निघाला अनंतामधून
होतसे विलीन अनंतात !
अनंतकाळ या अखंड तेवती
पहा दीपज्योति ठायी ठायी
युगायुगातून एक एक ज्योत
पाजळली जात आहे मार्गी
कितीदा घातली काळाने फुंकर
अधिक प्रखर झाल्या पण
चला प्रवाश्यांनो, पुढे पुढे आता
करू नका चिंता, भिऊ नका

## ६४ : कोटि ब्रम्हाण्डांची माय तू पवित्र

अगे धूलि, तुझे करितो लेपन
होऊ दे पावन भाळ माझे
असंख्य बीजांचे करिसी धारण
वृक्षलता तृण वाढवीसी
गरीब, अनाथ, दीन, निराधार
त्यांना मांडीवर झोपवीसी
तुझ्यातून घेते जन्म जीवसृष्टी
तुझ्यात शेवटी अंत पावे
कोटि ब्रह्माण्डांची माय तू पवित्र
तुझे गाऊ स्तोत्र कसे किती ?

## ६५ : जे का हीन दीन त्यांची ही माउली !

माझ्या हाती आहे एक पसा धूळ
काय हिचे मोल ? सांगा कुणी
कुणी तरी घाम कष्टाचा गाळिला
आहे मिसळला हिच्यामधे
कुणी हिजवर आसवे ढाळिली
त्यामुळे ही झाली आहे आर्द्र
कुणी दुःखावेगे उसासे टाकिले
उष्ण हिचे झाले अंतरंग
जे का हीन दीन त्यांची ही माउली
शिर हे पाउली हिच्या नम्र

## ६६ : जुनेच देईल तुज तांब्यादोरी

जुन्याचा धरूनी हात तू नवीना,
पाउले जपून टाक पुढे
एकाएकी त्याचा तोडून तटका
चालाया होशी का उतावीळ ?
' जाऊ द्या जुने ते मरणालागुनी ! '
कृतघ्न ही वाणी बोलसी का ?
जुनेच देईल तुज तांब्यादोरी
घेऊन शिदोरी पुढे चाल
होशील एकदा तूही जीर्णपर्ण
ठेव आठवण नीरंतर

# निसर्ग

## ६७ : प्रेमळ पवित्र करी तुझा स्पर्श !

हास हास बाई कलिके एकदा
आपुल्या सुगंधा सोड सोड
लडिवाळपणे केल्या गुदगुल्या
परी काही केल्या हासेना ती
तिला फुलवाया हवा रविकर
वायूची लहर खेळकर
व्यर्थ हे करिती गाण्याचा आग्रह
नाही अनुग्रह देवा, तुझा
प्रेमळ पवित्र करी तुझा स्पर्श
गाईन सहर्ष वाडेकोडे

## ६८ : महात्म्याची वृत्ति आपुल्या पावित्र्ये

एक ये वाऱ्याची झुळूक वाहून
काय तिचे गुण सांगू परी !
सहज ती गेली वनराईमाजी
तिने तरुराजी डोलवील्या
सहज ती गेली नदीपृष्ठावर
लहरी सुंदर उठवील्या
सहज ती गेली एका मार्गाहून
पांथस्थाचा शीण घालविला
महात्म्याची वृत्ति आपुल्या पावित्र्ये
शेकडो हृदये तोषवीते !

## ६९ : धन्य नरजन्म देऊनीया मला

धन्य नरजन्म देऊनीया मला
देवराया, केला उपकार
सृष्टीचे भाण्डार केले मला खुले
लोचन हे दिले आलोकना
दिली ग्राह्य बुद्धी, दिधली जिज्ञासा
सौंदर्य-पिपासा वाढवीली
कारागिरीतील जाणाया रहस्य
दिले रसिकत्व हृदयाला
वाणीस या माझ्या दिली काव्यशक्ती
वर्णाया महती देवा तुझी !

## ७० : दूर कोठेतरी--

दूर कोठेतरी अज्ञात जागेत
हासत डोलत आहे फूल
दूर कोठेतरी रानी अवखळ
इवला ओहळ वाहताहे
दूर कोठेतरी वृक्षी गोड गाणे
पाखरू चिमणे गात आहे
दूर कोठेतरी देत छाया गोड
एकटेच झाड उभे आहे
दूर कोठेतरी आपुल्या तंद्रीत
कवी कोणी गीत गात आहे

## ७१ : माझिया जीवनसृष्टीच्या ऋतूंनो !

पुष्पपल्लवांची आरास करीत
हासत वसंत येतो जगी
इंद्रधनुष्याचे तोरण बांधीत
वर्षा ये नाचत रिमझिम
हिमऋतु येतो धुके पसरीत
शीतळ शिंपीत दहिवर
माझिया जीवनसृष्टीच्या ऋतूंनो—
स्वर्गीय दूतांनो, कोठे गेला ?
फुले फुलवीत, मेघ बरसत,
दव उधळीत यारे सारे !

## ७२ : क्षितिजावरती झळक झळक !

क्षितिजावरती झळक झळक
उजळ ठळक शुक्रताऱ्या,
तेजस्वी, प्रसन्न, शांत तुझी मुद्रा
अगा महाभद्रा, संजीवनी
जातसे मनीचे किल्मिष झडून
होताच दर्शन प्रातःकाळी
थकल्या भागल्या जीवा दे हुरूप
तुझे दिव्यरूप सायंकाळी
दुःखी या पृथ्वीचा पाठीराखा बंधू–
आहेस तू, वंदू तुला आम्ही

## ७३ : फार थोडे आहे आता चालायचे !

फार थोडे आहे आता चालायचे
मन का हे काचे काळजीने ?
पिकले पान का कधी करी खंत !
नाचत गुंगत गळे खाली
फुलवीती मागे वृक्षाचे वैभव
कोवळे पल्लव वासंतिक
जीवनसृष्टीचा माझ्या ये शिशीर
आता का उशीर प्रयाणाला ?
चालवाया वंश हळूच हासत
येताहे वसंत मागाहून

## ७४ : शिशिराचा मनी मानू नका राग

नका व्यर्थ करू झाडांनो, ओरड
झाली पानझड सुरु आता
पिकल्या पानांचा धरू नका लोभ
फुटणार कोंब नवे पुन्हा
शिशिराचा मनी मानू नका राग
फुलवाया बाग येतसे तो
कृश–वृद्ध झाला, नका करू खंत
तारुण्य–वसंत आणील तो
नवीन पालवी, नवीन मोहर
कोकीळ सुस्वर गाईल तो

## ७५ : आपुले मन तू मोठे करशील

आपुले मन तू मोठे करशील
होईल मंगल सर्व काही
हासून उमले फूल कळीतून
सुंदर प्रसन्न वेल दिसे
निर्मळ वाहतो झरा थुईथुई
दरीखोरे होई शोभीवंत
खुला करी कंठ कोकीळ गाऊन
जादूने भारून टाकी राई
का रे धुमसशी मनी मूढ प्राण्या,
दे रे कुढेपणा टाकून तो

## —मी—

### ७६ : " कुणी शिकविले रचाया कवने ? "

" कुणी शिकविले रचाया कवने ? "
पुसती लाडाने बाळे माझी
" सोनुल्यांनो, होतो तुमच्यासारखा
आईचा लाडका बाळ मीही
मांडीवर मला निजवून आई
जात्यावर गाई गोड ओव्या
ऐकून प्रेमळ, प्रासादिक काव्य
फुलून हृदय गेले माझे
मनाशी लागलो करू गुणगुण
म्हणता ' कवन ' त्याला तुम्ही ! "

## ७७ : लुटा हो लुटा हो माझे खळे !

नाही माझे धन कधी झाले कमी
कुणबी असा मी भाग्यशाली
अलुत्यांनो या हो, बलुत्यांनो या हो,
लुटा हो लुटा हो माझे खळे !
देवाजीने दिली मला ही देणगी
सदा ही कणगी भरलेली
सुखाने आपुला घेऊन जा घास
कमी नाही रास व्हायची ही
नंतर मी माझी खाईन भाकर
देईन ढेकर समाधाने

## ७८ : खरा जो कुणबी साधितो ही घात

मृगाचा पडला पाऊस पहिला
वापसा जाहला पेरणीला
खरा जो कुणबी साधितो ही घात
झाकुनीया प्रेत म्हातारीचे
धरूनी पाभर करीतो पेरणी
करी मागाहूनी क्रियाकर्म
जीवनात माझ्या आज आली घात
मनसोक्त गात बैसणार
कसाहि कुणाचा येवो अडथळा
नाही माझा गळा थांबणार

## ७९ : चाळीसाव्या वाढदिवशी--

१९४६

बांधवांनो, आज माझा वाढदीस
लोटली चाळीस वर्षे वया
चाळीस पानांचा ग्रंथ मी लिहिला
पाहिजे पाहिला तपासुनी
जाहल्या चुका ज्या जाणून नेणून
दुरुस्त करीन शुद्धिपत्री
देवाच्या आज्ञेने आज मी नवीन
उघडून पान लिहू लागे
सरस, सुरेख उतराया लेख
प्रभुजीची एक हवी कृपा

## ८० : अवघे कुटुंब झाले माझे देव !

अवघे कुटुंब झाले माझे देव !
माझे मातृदेव, पितृदेव
भार्या माझी देव, स्वर्गसुखठेव
चिमुकले देव बाळे माझी
स्वसा माझ्या देव, बंधु माझे देव
गुरु माझे देव, शिष्य देव
सोयरेधायरे सर्व माझे देव
मित्र माझे देव, शत्रु देव
देवांच्या मेळ्यात मीही एक देव
करी देवघेव आनंदाची !

## ८१ : वाटसरू आहे वाट मी शोधीत

वाटसरू आहे वाट मी शोधीत
वाटाड्या, सोबत करी मला
'अंधार मनोरा' ज्याला म्हणतात
तिकडे ही वाट जात का रे ?
कितीक प्रवासी मार्गाने या गेले
पुन्हा नाही आले परतून
पदोपदी येते आडवे संकट
सर्वत्र कंटक पसरले
शेवट व्हायचा काय तो मी जाणे
तरी आहे जाणे मला प्राप्त !

## ८२ : शुद्ध निरामय, निर्व्याज आनंदा--

शुद्ध निरामय, निर्व्याज आनंदा,
कोठे तू सुहृदा गेलास रे ?
जीवनमार्गात पसरे अंधार
तुटता आधार तुझ्या सख्या,
तुझिया सांगाती गेला तो उल्हास
उदास उदास भासे मला !
भविष्यकाळीच्या अंधुक साउल्या
मजल्या वाकुल्या दावितात
ये रे जिवलगा, धरी माझा हात
हासत सोबत करी मला

## ८३ : सहज मी मागे वळून पाहिले

सहज मी मागे वळून पाहिले
चरकून गेले मन माझे !
विसरून गेले चेहरे कितीक
कितीक अंधुक ओळखीचे—
होते मजकडे आशेने पाहात
मजला बाहत मूकपणे
सांगायाचे होते राहिले हृद्गत
नव्हते ते येत बोलायला
वाईट वाईट वाटले मनाला
आणि ढळढळा रडलो मी !

## ८४ : होईल साकार स्वप्न एक तरी

स्वप्ने रचणारा मीच कारागीर
आहे जादूगार कलावन्त
'उगाच रची हा पत्त्यांचे बंगले,
वेड या लागले,' म्हणा तुम्ही
'उगा फुगवीतो रबराचे फुगे
फुटोनि अवघे वाया जाती !'
खूळ म्हणा तुम्ही, ही तो माझी कला
देत विरंगुळा जीवा माझ्या
होईल साकार स्वप्न एक तरी
आस ही अंतरी आहे माझ्या

## ८५ : एकला छेडीत आलो एकतारी

एकला छेडीत आलो एकतारी
नाही रागदारी ठावी मला
कुणी न भेटला साथी मार्गामधी
सूर न संवादी मिळे मला
पिचलेला पावा काढी बदसूर
तसा मी बेसूर गात आहे
बीन छेडी 'आशा' बांधून लोचन
तसा मी जीवन कंठिताहे
केव्हातरी माझी तुटणार तार
एकला जाणार आलो तसा

## ८६ : तुरी हातावर देऊन पाखरा—

तुरी हातावर देऊन पाखरा,
गेलास चतुरा निसटुनी
ळळा लावून तू जाशी अवचित
करूनी फजित मला का रे ?
कोणती लागली तुला अशी ओढ
कोणते गा वेड भरे मनी ?
करमत नाही, लागे हुरहूर
भरूनि ये ऊर स्मृतियोगे
तुझिया चंचूची खूण ही पाहून
एकान्ती स्फुंदून रडतो मी

## ८७ : कोंडून ठेविशी पिंजऱ्यात मला !

कोंडून ठेविशी पिंजऱ्यात मला
म्हणशी, 'तू तुला पांगळा रे'
उगवून आला अंकूर हा वर
धोंडा तू त्यावर ठेवलास
टोचून बोलशी, 'खुरट तू खुजा
पिंड रोगी तुझा मूळचाच !
माझ्या सामर्थ्याची तुला ना कल्पना
चालू दे वल्गना दुष्टा, तुझी
येईल तो क्षण, पंख उभारून
घेईन उड्डाण अंतराळी !

## ८८ : तुझा मी कोणता अपराध केला ?

तुझा मी कोणता अपराध केला ?
जिव्हारी मारिला बाण माझ्या !
एकान्तात होतो गात मी मंजुळ
तोच तू घायाळ केले मला
अंतरीच्या कोणा सांगू मी वेदना ?
तुला रे कल्पना काय त्याची !
भरून का कधी जखम येणार !
आता उपचार कशाला रे !
कसा कंठ खुला करून मी गाऊ ?
भरारी मी घेऊ अंतराळी ?

## ८९ : नाटकी मी, नका भुलू माझ्या सोंगा

काय जीवनाचे केले मी सार्थक !
करूनी नाटक दाखविले
कुणी केले टाळ्या पिटूनी कौतुक
त्यांना ते ठाऊक खरे खोटे
मुळातच होते थोडे भांडवल
होता तो केवळ मूर्खपणा
फसलो स्वतःला मानून शहाणा
अंगाशी बहाणा परी आला
नाटकी मी, नका भुलू माझ्या सोंगा
भीड नको, सांगा खरे खोटे !

## ९० : आई, तुझा कैसा होऊ उतराई ?

थोडके आपुले सोसून मरण
माझे तू जीवन घडवीले
थोडके आपुले देऊन व्यक्तित्व
माझे तू जीवत्व वाढवीले
थोडके आपुले देऊन कवित्व
माझे स्फूर्ति-काव्य फुलवीले
पाजळून माझी जीवनाची ज्योत
क्षीण तुझा होत आता दीप
बाळ तुझा होऊ पाहे उतराई
अशक्य ते आई, जन्मोजन्मी

## ९१ : तुमच्या प्रेमाची हवी मला जोड !

का हो चालवीली माझी छळणूक
काय माझी चूक झाली सांगा ?
तुमच्यासाठी मी फुलविली फुले
भांडार हे खुले तुम्हासाठी
तुम्हांला मिळावे सुखसमाधान
कष्ट रात्रंदिन करीत मी
जीवनरसाचा भरून मी प्याला—
दिला तो ओठाला लावा तुम्ही
तुमच्या प्रेमाची हवी मला जोड
नका हिरमोड करू माझा

## ९२ : नाही मज आशा उद्याच्या जगाची !

का रे दाखवीसी पुन्हा तेच स्वप्न
कराया उद्विग्न चित्त माझे !
मृगजळाचे ते दावून आभास
का रे खोटी आस निर्मितोस ?
घेत न कधी जे वास्तवाचे रूप
वाटे न हुरूप त्याचेविशी
माझे सुखदु:ख राहो ते माझेच
विश्व माझे हेच माझ्यापाशी
नाही मज आशा उद्याच्या जगाची
कालचीच ज्याची गती आज

## १३ : काही नाही माझ्या सांत्वनाला उणे !

शरीर हे गेले रोगांनी गांजून
काळीज जळून काळजीने
जीव करमाया निसर्गी जाईन
गुण मी गाईन प्रभुजीचे
घरी आईबाप, लहान भावंडे
वात्सल्याचे धडे देतात की
जिवलग माझा मित्र भेट देतो
जीव माझा होतो उल्हसित
काही नाही माझ्या सांत्वनाला उणे
म्हणून हे जिणे कंठितो मी

## १४ : तरी हा एवढा घ्यावा तिळगूळ !

देणे घेणे इथे कुणी हो कुणाला ?
गुणांनी गुणांला गुणायचे !
अधिकाची पेठ इथे उण्यातून
इथे कडूतून गोडपणा
पिकल्या शेताचे सुरू इथे खळे
मापणार खुळे मापोत ते !
अवघ्या भावांचा झाला इथे काला
अवघ्यांचा धाला जीव इथे
तरी हा एवढा घ्यावा तिळगूळ
हवे तर खूळ म्हणा माझे !

## ९५ : आता निरोपाचे बोलणे संपले !

आता निरोपाचे बोलणे संपले !
आत्म्याने अंकिले एकमेका
जीवीच्या धाग्यांची झाली एकजुटी
आता ताटातुटी–भाषा कैची ?
एकजीव झाले अवघ्यांचे भाव
का हो नाव–गाव उठाठेव ?
नव्या देणगीचा घेतलासे कुंभ
नये म्हणो थेंब वेगळाले
भावाबहिणींनो, झाली पाठवण
तरी आठवण संगे राहे

## ९६ : दुबळ्याचे बळ माझे ते कितीक !

दुबळ्याचे बळ माझे ते कितीक !
तरी कवतुक झाले किती !
दरिद्र्याचे घरी लुटिले भांडार
देऊन कुबेर–मोठेपणा
अज्ञानाचा बुक्का लावून कपाळा
ज्ञानाचा सोहळा केला तुम्ही
वाळवंटी तुम्ही पिकविला मळा
माझी किती कळा जाणे मीच !
जड झाले भारी भलाईचे ओझे
कसे रीण माझे फिटणार ?

## — संकीर्ण —

### १७ : नाहीतर उरी फुटशील !

चिमुकल्या अरे गोजिऱ्या पाखरा,
झाला का पिंजरा नकोसा हा ?
का रे थरथर असा कापतोस ?
का रे पाहतोस दीनवाणे ?
छळ होतो तुझा ठाऊक हे मला
परी तुझा गळा थांबला का ?
कधीतरी तुझी होणार सुटका
निःश्वास असा का सोडितोस ?
गाऊन हृदय मोकळे तू करी
नाहीतर उरी फुटशील !

## ९८ : कुऱ्हाडीच्या दांड्या, सांभाळ सांभाळ !

कुऱ्हाडीच्या दांड्या, सांभाळ सांभाळ
का रे होसी काळ गोतास तू ?
किती झाले ठार, किती जायबंद
तुझे भाईबंद शस्त्रे तुझ्या !
वृथा तुझी प्रौढी, गर्व–अहंगण्ड
उदंड तू दण्ड भोगशील !
देत मी इषारा, सावध सावध !!
नको आत्मवध करू ऐसा !
उलटेल शस्त्र उफाळून बंड
त्यात शतखंड होशील तू !

## ९९ : उमर खय्यामा—

उमर खय्यामा, गाऊन रुबाया
होशी कविवर्या अमर तू
जगाच्या फुलाचा घेतला आस्वाद
लुटिला आनंद तूच खरा !
जीवन–मद्याचा पेला काठोकाठ
भरून आकंठ प्यालास तू
तूच ठरविले वेडे शहाण्यांना
वेडा तू शहाणा ठरलास !
तुझे ते काव्यात्म, प्रसन्न सदय
विशाल हृदय देशील का ?

## १०० : माझ्या जीवनाचा झालो मी गायक !

कान देऊनीया बैसलो ऐकत
        जीवन–संगीत माझे मीच
विविध रागांचे सुरेल मीलन
        जाहले तल्लीन मन माझे
आज मी जाहलो पुरा अंतर्मुख
        माझे सुखदुःख झाले गाणे
बाहेरील जगी तीव्र कोलाहल
        त्यात हे मंजूळ गाणे माझे
माझ्या जीवनाचा झालो मी गायक
        आणिक रसिक श्रोता मीच !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि ....................

## लिंबोळ्या

### संदर्भ-सूची

१ समर्पण—रानजाईची फुले–माझ्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव. रानजाई १९३४ साली प्रसिद्ध झाला.

३ स्वप्न—माझी आई अशा तऱ्हेचे स्वप्न आपल्याला पडल्याचे सांगत असे.

५ पुनरागमन—माझ्या प्रथमपत्नीच्या अकाली निधनानंतर.

९ जकातीच्या नाक्याचे रहस्य—एक गस्तवाला या कवितेतील घटना सांगत आहे. हे जळके नाके पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर–पाबळ रस्त्यावर माझ्या पाहण्यात आले. पेंढाऱ्यांच्या धामधुमीत हे जाळलें गेले असे कल्पून Afred Noyes या कवीच्या The Highwayman या प्रसिद्ध कवितेच्या आधाराने या घटनेशी हे कथानक गुंफले गेले.

१० वेळ नदीच्या पुलावर—ही छोटी नदी पुणे जिल्ह्यातील पेठ गावाजवळून वाहात जाते. Edward Thomas या कवीच्या Adlestrop या कवितेवरून ही कविता लिहिण्यास प्रेरणा मिळाली.

१३ आजोबा—' कळंब ' हे गाव मंचर-नारायणगाव यांचे दरम्यान पुणे नाशिक रस्त्यावर आहे. ' अश्विनी नदी ' —घोडनदी.

१७ माझी बहीण– ' कमला ' ; आता सौ. कमल रामचंद्र झोळ.

१८ बाजार—ही कविता जळगावी लिहिली. जवळच गिरणा नदी आहे.

२३ सरोवर—कवी–इंग्लंडमधील Lake Poets. वर्डसवर्थ हा त्यांचा म्होरक्या. वुईल्यम–डेव्हिस–अमेरिकन कवी; यास Tramp poet असे त्याच्या भटकेपणावरून म्हणत असत.

२५ नांगर—ही कविता जळगाव येथे १९४३ साली दुसऱ्या महायुद्धाचा वणवा भडकला असताना लिहिली. परतंत्र भारत, महात्मा, हिटलर इ. उल्लेख तत्कालीन राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन समजून घ्यावेत.

घारकडा—माझे आजोळ कळंब. या गावाजवळ नारायणगाव रस्त्यावर हा

भुंडा डोंगर आहे. पंख उभारून उडण्याच्या स्थितीत घार जशी दिसते तसा हा डोंगर दिसतो, म्हणून ' घारकडा ' हे नाव पडले असावे.

हलायुध–बळरामास ' हलायुध ' म्हणत असत.

प्रख्यात आङ्ग्ल कवी व कादंबरीकार थॉमस हार्डी याच्या Dynasts या प्रदीर्घ काव्यात हा प्रसंग आहे. वाटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा पराभव झाला. त्या विध्वंसाच्या पार्श्वभूमीवर एक शेतकरी शांत चित्ताने आपला नांगर हाकीत होता.

२६ इंफाळ-कॅप्टन लक्ष्मीच्या डायरीतून कवितेस हा विषय मिळाला. बहुधा १९४३–४४ साल असावे; आझाद फौजेत सामील न झालेल्या एका मराठा शिपायाच्या मनाची आंदोलने या कवितेत दाखविली आहेत.

२७ गस्तवाल्याचा मुलगा—एका वेस्कराने ही प्रत्यक्ष घडलेली गोष्ट मला सांगितली. धर्माजी हे त्या वेस्कराचे नाव.

२९ सोनावळींची फुले—विख्यात आङ्ग्ल कवी वुईल्यम वर्डस्वर्थ याच्या Daffodils या कवितेचे रूपान्तर.

३० प्रचीती—ठाणे जिल्ह्यात डहाणूजवळ समुद्रकाठी वसलेल्या बोर्डी या गावी असताना ही कविता रचली. बहुधा १९५० साल असावे.

३२ दूर दूर कोठे दूर—या ओळी मी स्वप्नात ऐकल्याचा भास झाला. कोलेरिजच्या ' कुब्लाखान ' या कवितेचा थोडासा प्रत्यय आला.

३३ हे स्वतंत्र भारता—१५ ऑगस्ट १९४७ रोजी रचली.

३४ गुरुवर्य बाबुरावजी जगताप यांस अभिवादन—गुरुवर्य जगताप यांच्या षष्ट्यब्दिपूर्ती समारंभानिमित्त ही कविता रचली. डिसेंबर १९४८ मध्ये हा समारंभ पुण्याच्या शिवाजी मराठा हायस्कूलच्या पटांगणात झाला. रियासतकार सरदेसाई अध्यक्ष होते. त्या वेळी ही कविता म्हटली गेली. खडकावरती —गुरुवर्य जगताप यांनी शिवाजी मराठा हायस्कूल स्थापन केले–त्या भागाला ' खडक ' हे नाव आहे.

३५ अहो खानदेशस्थ सन्मित्र माझे—जळगाव–खानदेश येथील मराठा विद्याप्रसारक समाजाने चालविलेल्या ट्रेनिंग कॉलेजचा मी प्राचार्य होतो ( १९४१ ते ४५ ). या संस्थेचे चालक खानदेशातील पाटील मंडळींच

होती. १९४५ जूनमध्ये मला विद्याखात्याच्या आदेशानुसार परत सरकारी नोकरीत यावे लागले. त्या वेळी संस्थेने माझ्या कार्याचा गौरव करून मला मानपत्र अर्पण केले. त्या मानपत्रास दिलेले हे काव्यमय उत्तर. हा समारंभ बहुधा ऑक्टोबर १९४५ मध्ये झाला असावा. त्या वेळीं ही कविता मी म्हणून दाखविली.

जरीला—ही खानदेशमधील कापसाची प्रसिद्ध जात.

मेहरुणी बोरे—जळगावजवळ मेहरूण हे गाव आहे. तेथली बोरे महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत—अतिशय गोड, साखरेसारखी.

३६ त्रिपुरी पौर्णिमा—बोर्डी येथील ग्रॅज्युएट्स बेसिक ट्रेनिंग सेंटर– ( जीवन शिक्षण मंदिर ) या कॉलेजचा मी प्राचार्य असताना दि. २४–११–५० रोजी विद्यार्थ्यांनी त्रिपुरी पौर्णिमा साजरी केली. मोठा दीपोत्सव केला. त्याच वेळीं मला ताप आल्याने या उत्सवात मी भाग घेऊ शकलो नाही. वाईट वाटले. तशा मनःस्थितीत ही कविता लिहिली. कविता अपूर्ण आहे. ही अपूर्ण कविताच त्या वेळच्या विद्यार्थिनी श्रीमती लीला चंदावरकर यांनी त्या रात्री चंद्रिका भोजनाच्या वेळी म्हटली.

आश्रम—जीवन शिक्षण मंदिर, बोर्डी–विद्यार्थ्यांचे तेथील सामुदायिक जीवन व अभ्यासक्रम आश्रमपद्धतीचा असे.

४१ लिंबोळ्या—ही कविता बोर्डीस १९४९ च्या उन्हाळी सुटीत लिहिली. त्या वेळीं मी तिथे एकटाच होतो. खिन्न एकलकोंड्या अवस्थेत ही कविता लिहिली.

–जीवन आश्रम— जीवन शिक्षण मंदिर, बोर्डी. समुद्रकाठावरील एका बंगल्यात हे कॉलेज होते ( १९४८ ते १९५३ ). पुढे ते धुळ्यास बदलून गेले. त्या इमारतीच्या आवारात लिंबाचे झाड होते.

–वाडी–पडळ—पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील 'मंचर' हे माझे गाव. तेथील आमची शेतवाडी व पडळ. 'राजहंस' तेथील एका नामांकित गावठी आंब्याचे नाव.

दा. क.

# अभंग-कूजन

१३ प्रसिद्ध श्लोक—
नेपाळेश्वर भाललग्न चिखला कस्तूरिका मानिती !

१९ मुख्य कल्पना रवीन्द्रनाथ ठाकूर यांची.

२२ ' प्रसंग मोठाले येतील जातील ', रे. टिळक यांच्या अभंगातील एक ओळ.

३२ नोआखालीचे हत्याकाण्ड आणि महात्माजींची पदयात्रा.

३३, ३४ कलकत्त्याची दंगल व नोआखलीचे हत्याकाण्ड. ' एकला चलो रे ! '

३५, ३६, ३७ महात्माजींचे महानिर्वाण दि. ३०–१–१९४८ ला उद्देशून.

३८ ते ४६ स्वातंत्र्यलढ्याची शेवटची आंदोलने १९४६–४७.

४० कलकत्त्याची दंगल व महात्माजींवर हल्ला.

४३ कै. नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांची आझाद हिंद सेना.

४४ पाकिस्तानची निर्मिती.

४७ ते ४९ दुसऱ्या महायुद्धाचा शेवट.

५० ' Time you old Gypsy man ' या कवितेचा अनुवाद. साधू पॉलचे मंदिर—St. Paul's church.

५२ प्रख्यात कवी एस. टी. कोलेरिज याच्या एका कवितेवरून.

५७ अणुस्फोटकाचा जपानवर झालेला हल्ला.

६० ' We have no Time to stand and stare, ' William Davis.

६१ मार्कोनीचा अद्भुत शोध—निगूढ संगीत Song of Universe.

६६ ' जुने जाऊ द्या मरणालागुनि ' तुतारी—केशवसुत.

७३ ' If winter comes is spring far behind ? —Shelley.

७९ १९–८–१९४६ वाढदिवस.

८१ ‘ अंधार मनोरा ’

‘ Childe Roland to the Dark Tower came ’
महाकवी रॉबर्ट ब्राउनिंग याची एक प्रसिद्ध कविता.

८३ ‘ ना खंत ना खेद ’ ‘ With no regrets ’
या कृष्णा हाथीसिंग यांच्या ग्रंथातील एका प्रकरणाच्या आरंभीच्या अवतरणावरून.

८५ ‘ बीन छेडी आशा ’—एक प्रख्यात चित्र.

९५ बोर्डीस असताना—विद्यार्थ्यांना दिलेला निरोप.
नवी देणगी—महात्माजीपुरस्कृत ‘ नई तालीम. ’

९६ बोर्डीस असताना—विद्यार्थ्यांना दिलेला निरोप.

१०४ बोर्डीस असताना—२३-१-१९५१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
अनुक्रम 63680 वि: ...
क्रमांक 9EEU नों. दि. 8/3/09

REFBK-0013498
REFBK-0013498